दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

## रविवार पुरवणी २३ फेब्रुवारी २०२५

Maharashtra
मराठी

# ....तरच मातृभाषा संपन्न होईल !



जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

नुकताच जागतिक मातृभाषा दिन संपन्न झाला. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजाराहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. मातृभाषेचे संवर्धन व्हावे आणि त्या भाषेची संस्कृती टिकून राहावी यासाठी १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. एकाच मातृभाषेतील लोकांनी एकत्र येऊन मातृभाषेतील शिक्षण, साहित्य आणि संस्कृती यांबाबत चर्चा करून तिच्या संवर्धनासाठी ठोस कार्यक्रम आखावेत हा यामागील प्रमुख उद्देश आहे.

c सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हाट्सअप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो मात्र दिवस सरला की दुसऱ्या दिवशी पुन्हा येरे माझ्या मागल्या.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात त्यातही राज्यातील प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वर्षागणिक वाढू लागले आहे, पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत.

लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे. मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्वाचे आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो.

आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तिन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले. बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल.

**आपल्या मालकीच्या वस्तूंविषयी आपली आसक्ती असते मग आपल्या मातृभाषेविषयी आपल्या मनात आकस का ? मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे.** आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना मग समोरचा कोणत्याही भाषेचा का असेना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत.

पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम "मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. 'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा. आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे.

**'वाडा'** या पुस्तकाचे प्रथितयश लेखक **श्री. विलास कोळी** आजपासून **'गड किल्ल्यांचे स्थापत्य शास्त्र'** या सदरातून गड - किल्ल्यांचे बांधकाम याबद्दल अतिशय माहितीपूर्ण आणि अभ्यासू विवेचन देणार आहेत आजपासून हे नवीन सदर दर रविवारी आपल्या भेटीस येणार आहे.



# छत्रपती शिवरायांचे स्वराज्य रक्षक दुर्ग

## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर, त्रिंबक,
ता.मालवण.
मो.९४२१७९५९५५.

दुर्ग म्हणजे किल्ला. छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यात एकूण तीनशे साठ दुर्ग होते. त्यांपैकी अगदी मोजके किल्ले छत्रपती शिवाजीमहाराजांनी स्वतः बांधून घेतले होते. मात्र तेवढे वगळता इतर किल्ले छत्रपती शिवाजीमहाराजांच्या आधीपासूनच म्हणजे काही दुर्ग तर सुमारे दोन ते अडीच हजार वर्षांपूर्वीच बांधलेले होते. इतक्या प्राचीन काळापासून भारतातील राज्यकर्ते दुर्गांचे महत्त्व जाणून होते असे म्हणावे लागेल.

नाणे घाटातील लेण्यांमधल्या शिलालेखाचा उचित अर्थ लावल्यास असे कळते की नाणे घाटाची निर्मिती दोन हजार वर्षांपुर्वीची आहे. या घाटाचे बांधकाम पाहता चावंड, हडसर, शिवनेरी हे गिरीदुर्ग सातवाहन राजांच्या काळातील असावेत असे वाटते. यांपैकी शिवनेरी किल्ल्यावर शिवरायांचा जन्म झाला. माँसाहेब जिजाबाईंच्या सुरक्षिततेसाठी शहाजीराजेंनी एखाद्या राजवाड्याऐवजी शिवनेरी या गिरीदुर्गाचीच निवड केली यावरून किल्ल्यांचे महत्त्व अधोरेखित व्हावे.

छत्रपती शिवरायांनी किल्ल्यांचे महत्त्व जाणले होते. त्यांनी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहताना दुर्ग, त्यांची रचना, गरज, उपयोग, महत्त्व, स्थान आदी बाबींचा सूक्ष्म अभ्यास केला होता. हिंदवी स्वराज्य प्रत्यक्षात आणावयाचे असेल तर भक्कम तेवढेच अवघड दुर्ग आपल्या ताब्यात असणे गरजेचे आहे असे त्यांचे ठाम मत होते. त्यासाठी त्यांनी दुर्गशास्त्र नावाचे एक स्वतंत्र शास्त्रच निर्माण केले होते. स्वराज्याची घडी बसविताना शिवरायांनी जुने दुर्ग ताब्यात घेतले. पडक्या दुर्गांचा पुनरोद्धार केला. तट, बुरुजांची दुरुस्ती केली. दुर्गांवरचा बंदोबस्त मजबूत व कडक केला. जेथे दुर्ग नव्हते, तेथे नवे दुर्ग बांधले. ते बांधण्यासाठी लागणारे द्रव्य संपादित केले. त्यासाठी साहसी मोहीमा पार पाडल्या. स्वराज्याच्या निर्मितीत अशा दुर्गांचे महत्त्व अधोरेखित करताना छत्रपती म्हणाले होते, किल्ले किंवा दुर्ग हातात असल्याशिवाय स्वराज्य निर्माण करणे व ते टिकवून ठेवणे शक्य नाही. दिल्लीश्वरासारखा मोठा शत्रू स्वराज्यावर चालून आला तरी त्याचा येथील दुर्गांमुळे टिकाव लागणार नाही. स्वराज्यात तसे नवे जुने तीनशे साठ दुर्ग आहेत. त्यांपैकी प्रत्येक किल्ला मजबूत व अभेद्य



आहे. किमान वर्षभर तरी तो काबीज करणे शत्रूस शक्य होणार नाही. एकेक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी तीनशे साठ वर्षे लागतील. बाल शिवराय जिजाऊंसोबत पुण्यास आले तेव्हा शहाजीराजांच्या जहागिरीत एकही किल्ला नव्हता. त्याच वेळी दक्षिणेकडील मुरुबदेवाचा उंच सुळका शिवरायांना साद घालीत होता. दुर्लक्षित तोरणा किल्ल्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या या डोंगरावर शिवरायांनी दुर्ग उभारणीची मुहुर्तशिळा ठेवली. सहा ते सात वर्षांच्या अथक मेहनतीमुळेच एक अजोड किल्ला साकारला. छत्रपती शिवाजीमहाराजांनी या किल्ल्याचे नाव राजगड ठेवले. स्वराज्य निर्मितीत या किल्ल्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

स्वराज्यासाठीच्या अनेक मोहिमांचे बेत येथेच आखले गेले होते. स्वराज्य निर्मितीतले अनेक चढ उतार देखील याच किल्ल्यावरून शिवरायांनी अनुभवले होते. त्यानंतर महाबळेश्वर येथून कोकणात उतरणाऱ्या पारघाटात छत्रपतींनी अतिशय मजबूत असा प्रतापगड बांधला. कोकणातील मालवण येथील समुद्रातील कुरटे बेटावर सिंधुदुर्ग बांधला. अनेक बखरकारांनी सिंधुदुर्गाचा उल्लेख ' शिवलंका' असा केला आहे.

छत्रपतींच्या स्वराज्याची राजधानी असलेला रायगड हा तसा दोन ते अडीच वर्षे जुना असलेला दुर्ग अगदी सातवाहन काळातील असावा. लोहगड, देवगिरी, शिवनेरी, विसापूर, सुधागड इत्यादी प्राचीन किंवा पुरातन किल्लेदेखील त्याच काळातील असावेत. याशिवाय पन्हाळा, केळंजा, चंदन, वंदन, कल्याणगड, पांडवगड, बावडा, भूधरगड, रांगणा, वसंतगड, वैराटगड, विशाळगड, सातारा, सिंहगड इत्यादी दुर्ग शिलाहार राजवटीत बांधलेले आहेत. मात्र स्वराज्याच्या राजधानीसाठी रायगडाची निवड करणे म्हणजे छत्रपती शिवाजीमहाराजांच्या अद्भुत चातुर्यगुणांची प्रचिती आहे. रायगड कोकणात असला तरी घाटापासून फारसा दूर नाही. गडाच्या चहुबाजूंस डोंगरदाटी. वरंधघाट, लिंगाणा, माणगाव वगळता इतर ठिकाणांहून हा दुर्ग पटकन दिसतही नाही. घाटापासून जवळ असला तरी तेथे सहज जावे असाही नाही. येथून समुद्र तीस मैलांवर. चहुबाजूंनी तीष्ण, अणकुचीदार ताशीव कडा, त्याच्याकडे बघूनच शत्रुला कापरे भरेल इतका अवघड गिरीदुर्ग राजधानीसाठी निवडताना छत्रपतींनी किती सूक्ष्म अभ्यास केला असेल याची प्रचिती आल्याशिवाय रहात नाही.

'ज्याचे किल्ले, त्याचे राज्य' या नीतीचा विचार करून छत्रपती शिवाजीमहाराजांनी स्वराज्य निर्मितीत दुर्गांना फार महत्त्व दिले. त्यामुळेच अनेक बखरकारांनी छत्रपती शिवाजीमहाराजांचा उल्लेख 'दुर्गपुत्र' असादेखील केला आहे. हजारो वर्षांपुर्वीचे मजबूत दुर्ग, छत्रपतींनी नव्याने बांधलेले सिंधुदुर्ग, प्रतापगड, कुलाबा, खांदेरी, साजरा, गोजरा यांसारखे दुर्ग हे सारे समृद्ध वैभव आजदेखील आधुनिक महाराष्ट्राचा समृद्ध इतिहास बनून राहिले आहेत. असे नवे दुर्ग निर्मिणाऱ्या, जुने व पुरातन दुर्ग दुरुस्त करून त्यांचा स्वराज्य निर्मितीत फार मोठा उपयोग करून घेणाऱ्या आणि आपल्या महाराष्ट्राचा इतिहास वैभवशाली बनविलेल्या छत्रपती शिवाजीमहाराजांस आज त्यांच्या जयंतीदिनी मानाचा मुजरा!





# पोपट

## गावाकडच्याआठवणी



भाग- ९

भावेश लोंढे,
दापोली
मोबा. ९७६९३८६०९१

माझे बाबा सामान्य शेतकरी असल्याने त्यांना गाईगुरे सांभाळण्याची खूप आवड होती. विशेष करून त्यांचे बैलांवर जास्त प्रेम होते. सर्जा-राजा, टीका-पोपट असे चार बैल दिमतीला होते.आईला आंदण दिलेल्या देवका या गाईचा वासरू म्हणजे मारकुटा बैल पोपट. बैलांना सांभाळण्यासाठी बाबा जीवाचे रान करायचे. त्यांना हिरव गवत, कडबा, पेंड, गुळी असा सांज सकाळी चारा घालून बैलांना धष्टपुष्ट करीत असत. चारकोंडामध्ये लोंढेंचे बैल प्रसिद्ध होते. नांगरताना ,शेतात चालताना त्यांचा ऐटबाज तोरा आणि बाबांची डौलदार चाल एक आगळावेगळा देखावा दिसत असे. भात लावणीत विशेषता चार-पाच खंडीचा शेत या बैलांवर अवलंबून होता. विशेषत: पोपटावर बाबांचे जास्त प्रेम होते. वर्णाने काळा, उंचीने साडेचार फूट होता. त्याची नजर भेदक होती. शिंगे बुटके होते. परंतु पोपट आला की आला सर्वांची गाळण उडायची. वाडीतली खेळणारी मुलं, आयाबाया दार लावून बसायची, जोपर्यंत वाड्यात दाव्यावर बांधला जात नाही, तोपर्यंत दार उघडत नसत. पोपट बाबांच्या एका धाकात जाग्यावर उभा राहायचा. एकदा की भात लावणी संपली की, पाऊस संपेपर्यंत उनवरच्या रानात बाबांच्या बैलांचा दरारा असे, रानावनात चरताना बाबांच्या बैलाजवळ कोणाची गुरे जायचे नाहीत. एका डरकाळीत तो रान जागा करायचा.

पोपट चपळ आणि हुशार होता. अंगानं मजबूत, गळ्यात माळ, घंटा, कपाळावर पांढरी चंद्रकोर, आणि डोळ्यात एक वेगळीच चमक होती. गावातल्या शेतकऱ्यांत तो सगळ्यांचा लाडका होता. पोपट फक्त नांगर ओढण्यापुरता बैल नव्हता, तो शहाणाही होता. बाबांना कुठे जायचे आहे तो बरोबर ओळखायचा. सर्वांच्या पुढे तो इच्छित स्थळी पोहचलेला असायचा. त्याचा कोल्ला दुसऱ्या बैलाच्या तुलनेत भारी होतं. तो तुडतुडीत आणि ताकदीचा होता.

दिवाळीनंतर बाबांचे शेती कामे सोडून गवंडी काम चालू झाले की दावणीला लागलेले बैल मे महिन्यात अखेरीस भाटनावर उधळायला सोडायचे. एक दिवस आधीच वाडीत बैल सोडण्याची ताकीद देऊन ठेवायचे. मग आम्ही सारे लहान मुले बैल धावत सुटले की पाठीमागून आम्ही धावत तळात पोहोचायचो. सुरक्षित



बांधावर बसून पोपट टीकाची आणि सर्जा राजाची झुंज पाहत राहायचो. दोन दोन तास झुंज चालायची. कुणीही मागे हटायला तयार नसत. डरकाळ्या फोडत एकमेकांवर धावत जायचे. शेवटी पोपट जोराची धडक देऊन टिक्काची पाठलाग करून पिटाळून लावायचा. बाबांचे बैल तळात असले की एकही बैल आसपास दिसायचं नाही आणि आलाच तर मग पोपट त्याला डीरकून डीरकून पळवून लावायचा.

चरणे कमी आणि झोंबी करण्यासाठी भटनावर बैल सोडावे लागत होते.पोपट हा झोंबी करण्यात संपूर्ण गावात प्रसिद्ध होता. इतर बैल दमले तरी पोपट थांबत नसे. त्याच्यात एक वेगळीच जिद्द आणि शक्ती होती. सकाळी शेतात जुंपला की संध्याकाळपर्यंत अखंड राबायचा. कितीही कडक ऊन असो किंवा जोरदार वारा, पोपटच्या पावलांचा वेग कमी होत नसे.

पोपट किती सराईतपणे झोंबी करतो! त्याच्या जोडीचा बैल अधूनमधून थांबत असे, पण पोपट मात्र न थांबता शेत फाळत राहायचा. एका दिवसात इतर शेतकऱ्यांच्या तुलनेत आमच्या शेतीच अर्ध्याहून अधिक काम होत असे.थोड्या दिवसात रोहिणी सुरू झाल्यावर पेरणी व्हायची.पुन्हा शेतीच्या कामात या बैलजोडी संगे बाबा अपार मेहनत करीत असत. बैलांना बाबांनी हातच्या फोडाप्रमाणे जपले होते.आपल्या मुलांप्रमाणे ते बैलांवर प्रेम करीत असत.बैल त्यांचे जीव की प्राण होते.

कालांतराने बाबांच्या आजारपणाने शेतीचे कामे मागे पडू लागली. हळूहळू शेती करणे दुरावत गेले. एके दिवशी अचानक बाबांची तब्येत बिघडली.बाबांना मुंबईला आणावे लागले.त्यांचे दोन महिने मुंबईतच गेले. आई व छोटा भाऊ ही मुंबईला आल्यावर पोपट दावणीवर एकटा पडला होता.बरेच दिवस झाले

आपला धनी कुठे दिसत नाही.वाड्यात येत नाही.कुठे गेला आहे. हे त्याला देखील माहित पडले असावे. त्याने पेंडा, चारा खाणं बंद केले होते. दोन दोन बादली पाणी पिणारा पोपट घोट घोट पाणी पिताना अश्रू गाळीत होता. ज्याने आपल्याला सांभाळले तो आपला मालक शेवटच्या क्षणी आपल्या सोबत नाही याची त्याला जाणीव होत असे. रोज त्याच्या हातून प्रेमानं चारा खाणारा पोपट त्या दिवशी शांत होता. अंगात पूर्वीसारखी ऊर्जा नव्हती, डोळ्यांत थोडा थकवा दिसत होता.

गोठ्यात इतर लोक होते, पण पोपटचा जीव त्याच्या खऱ्या मालकाची वाट पाहत होता. संध्याकाळची वेळ होती आणि गावावरून विमल मावशीचा फोन आला. पोपट गेल्याचे सांगितलं. बाबांना खूप वाईट वाटले. ते रडायला लागले. आजारामुळे मुंबई ते उन्हवरे प्रवास करू शकत नव्हते. ज्यांनी आपल्या शेतीत सोनं पिकवलं. धान्याची रास ओतली होती. त्या माझ्या प्राणप्रिय पोपटाजवळ मी असायला पाहिजे होते. पण नियतीच्या ते मान्य नव्हते. पोपट गेल्याचे दुःख सगळ्यांना झाले. पोपट शांतपणे पडला होता. तो गेल्याचं बघताच वाडीतील लोकांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. पोळ्याच्या दिवशी डोक्यावर फुलांच्या माळा मिरवणारा, शेतात घाम गाळणारा पोपट पोरका करून गेला होता. बाबाची पोपटाने साथ सोडली होती. शेवटी बाबांना आपल्याला लाडक्या बैलाचा निरोप घेता आला नाही. गावकऱ्यांनी बाबांच्या सांगण्यावरून अंत्यसंस्कार केले.

बाबांना कधी न दिसणारा शेतातील ढेकळ फोडणारा पोपट माती आड गेला होता. बाबांच्या मनात ही सल कायम बोचत राहते. अजूनही तो पडका वाडा आणि बैलाची दावण साक्ष म्हणून बाबांनी जपून ठेवली आहे. खिल्लारी जोडीचां चौखुर उधळलेले खुर, छनछन वाजणारी कंठीचा आवाज मनात घुमत आहे. मेहनतीचा आणि निस्वार्थी प्रेमाचा एक जिवंत नमुना म्हणून त्याला दफन केलेल्या जागेवर आंब्याचे झाड लावून त्याचं संगोपन करत आहेत. त्या आंम्ररुपात पोपट आजही बाबांच्या आठवणींमध्ये जिवंत आहे.



## कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी- भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.



## भाग --२
## जमिनीसंबंधी महत्त्वाचे उतारे

**ज्येष्ठ विधिज्ञ श्रीनिवास घैसास हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.**

### जमीन हक्क बदल दैनंदिनी - गाव नमुना सहा

महाराष्ट्र राज्यात जमीन महसूल संहिता १९६६ च्या प्रकरण १० अ मध्ये हक्क नोंदीच्या कायदेशीर तरतुदी समाविष्ट आहेत व हा कायदा राज्यात एकत्रपणाने लागू करण्यात आला आहे. आता ह्या जमिनीचे दप्तर आपण जेव्हा पाहतो किंवा कसे ठेवावे ह्याचा अभ्यास करतो तेव्हा आपल्या असे लक्षात येईल की, खालील गोष्टी महत्त्वाच्या असतात- १) गाव नमुना सहा फेरफार नोंदवही. २) गाव नमुना ७/१२ हक्क नोंद. ३) खाते पुस्तिका. ४) गाव नमुना ८ अ. हे दस्तऐवज जमिनीच्या दप्तराचे मुख्य आधारस्तंभ आहेत.

गाव नमुना सहा फेरफार नोंदवही हा अतिमहत्त्वाचा नमुना आहे. भूमापन केलेल्या जमिनीवर जेव्हा काही हक्क निर्माण होतात, तेव्हा या निर्माण झालेल्या हक्कांचे किंवा हक्कामध्ये झालेल्या बदलाचे संक्षिप्त वर्णन करून या नमुन्यात नोंदवायचे असतात. म्हणजेच हा नमुना म्हणजे हक्क बदलांची नोंद घेणारी एक प्रकारची दैनंदिनीच आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. ह्या नमुन्यामुळे दोन प्रमुख उद्दिष्ट साध्य होतात. ती म्हणजे जमिनीवर ज्यांचे काही हक्क आहेत, त्यांचे संरक्षण करणे हे एक होय आणि महसूल व दिवाणी कोर्टातील जमिनीबाबतच्या दाव्यांची संख्या कमी करून चालणारे दावे कमी खर्चात व सरळ सुलभपणे चालवणे हे दुसरे होय. एकदा हक्क नोंद झाली की तो नमुना अद्ययावत ठेवायचा असतो.

**आता ह्या नमुन्यात फेरफार कसे करता येतात ते आपण पाहूया.**

१) संहिता कलम १४९ प्रमाणे हितसंबंधियांकडून आलेली तोंडी अगर लेखी वर्दी. २) संहिता कलम १५० प्रमाणे हस्तांतरणाने प्राप्त झालेल्या हक्काबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी किंवा त्यांनी अधिकार प्रदान केलेल्या तहसीलदारांनी दिलेली माहिती. ३) संहिता कलम १५४ प्रमाणे नोंदणी अधिकाऱ्यांनी हस्तांतरणासाठी पाठविलेली माहिती.

वर दर्शविलेल्या मार्गाशिवाय तलाठी स्वतः ह्या नमुन्यात कुठलाही फेरफार करू शकत नाही. हक्क नोंद अपुरी वाटत असेल तर तो तहसीलदारांकडे आपला अहवाल पाठवितो व त्यावर त्यांनी दिलेल्या हुकूमाची अंमलबजावणी करतो. धारणकर्त्यांचे म्हणजेच कब्जेदाराचे नाव हक्क वहीत नोंदवले जाते. जर कब्ज्याबद्दल संशय असेल तर जास्त सबळ हक्क ज्याचा असेल त्याचे नाव नोंदवले जाते. सदर नोंद ही नोंदणी अधिकाऱ्यांनी मंजूर करावी लागते. थोडक्यात ह्या सहा गाव नमुन्यातील नोंदी ह्या नोंदणी अधिकाऱ्यांकडून नोंद मंजूर करून घेतलेल्या असाव्या लागतात. सदर नोंदणी मंजूर करताना ज्या हस्तांतरणांना जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी लागते, ती घेतली गेली आहे किंवा नाही हे नोंदणी अधिकाऱ्याने पाहणे आवश्यक असते. त्यासंबंधी नोंदणी अधिकाऱ्याने संहिता कलम १४९ ध्यानात घेणे जरूरीचे आहे.

आता ह्या नमुन्यात खालील तपशील तलाठी ह्यांनी नोंदवायचा असतो तो असा १) क्रमांक, २) फेरफारनोंदीची तारीख, ३) फेरफाराची वर्दी मिळाल्याची तारीख, ४) गाव नमुना ८ मधील खाते दुरुस्त करणे, आवश्यक असल्यास तो खाते क्रमांक, ५) व्यवहार उदा. विक्री, भाडेपट्टा, गहाण टाकणे वगैरे. ६) कलम १५० (२) प्रमाणे फेरफारांची पूर्ण प्रत चावडीवर प्रसिद्ध केल्याची तारीख ७) कलम १५०

(२) प्रमाणे हितसंबंधियांना सूचना दिल्याची तारीख, हे सारे सोपस्कार तलाठी यांनी पार पाडायचे असून काही भाग काळजीपूर्वक नोंदवावयाचा असतो. उदा. विक्री व्यवहार असेल तर किंमत, हुकूमानुसार फेरफार असेल तर अधिकाऱ्याचे नाव, हुकूमाची तारीख, क्रमांक इ. या नमुन्यातील बदलाप्रमाणे ७/१२ च्या उताऱ्यातदेखील तसा बदल होणे आवश्यक असते. मात्र अज्ञानाचा सज्ञान होणे किंवा तोंडी नोंदलेला करार लेखी करारात हस्तांतरण होताना ७/१२ मध्ये दुरुस्ती करताना नमुना सहामध्ये त्यात फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

गावसजाच्या तलाठ्यांनी फेरफाराचे आधारभूत कागद ३ प्रकारात ठेवणे आवश्यक असते. १) आकारबंद पत्रक गाव नमुना १ बरोबर. २) नोंदीचे उतारे क्रमावारीने. ३) हुकूम दस्तऐवजाच्या नकला, वां व इतर कागदपत्रे अनुक्रमाने स्वतंत्र फाईलमध्ये, अशी ही गाव नमुना सहा फेरफार नोंदवही कधीही पूर्ण होत नाही. ह्या फेरफार नोंदवहीच्या चार उपनोंद वह्या असतात.

१) गाव नमुना सहा 'अ' विवादात्मक प्रकरणांची नोंदवही,

२) गाव नमुना सहा 'ब' कलम १५२ प्रमाणे दंडवही.

३) गाव नमुना सहा 'क' वारसा हक्क नोंदवही

४) गाव नमुना सहा 'ड' नव्या पोटहिश्श्यांची नोंदवही.


ह्या उपवह्याही अद्ययावत ठेवाव्या लागतात.

ह्या उताऱ्यातील नोंदीप्रमाणे त्याची दुरुस्ती ७/१२ मध्ये होते. म्हणूनच गाव नमुना सहा, फेरफार नोंदवही हा फार महत्त्वाचा दस्तऐवज आहे. आता ह्या नोंदी करताना निरनिराळ्या क्लुप्त्या वापरल्या जाऊन संबंधित मंडळी ती नोंद आपल्याला हवी असेल अशी कशी होईल ह्याकडे जातीने लक्ष देतात. प्रत्येकाने जरी ह्या गाव नमुना सहा फेरफार नोंदवहीतील नोंदी व्यवस्थित होतात की नाही हे पाहायचे ठरवले तरी ते केवढेतरी मोठे काम होईल.

आता या गाव नमुना सहामध्ये ज्या फेरफाराच्या नोंदी होतात, त्या महत्त्वाच्या असतात आणि जमिनीच्या व्यवहारात जी काही फसवणूक सुरू होते त्याचे मूळ बहुतांशी या फेरफार नोंदीमध्येच असते. म्हणूनच या फेरफारातील संभाव्य धोके जाणून घेण्यासाठी आपण पुढील माहिती पाहूया.

जमिनीच्या हक्क नोंदणीमध्ये गाव नमुना सहा फेरफार नोंदवही ह। फार महत्त्वाचा दस्तऐवज असतो. प्रत्येक हक्क नोंदणीची नोंद ह्या वहीमध्ये करणे आवश्यक असते. ह्या नोंदवहीत तलाठी स्वतःहून काही फेरफार करू शकत नाहीत. संहितेच्या कलम १४९ च्या तरतुदीनुसार १) हक्क बदलाची तोंडी अगर लेखी वर्दी. २) नोंदणी अधिकाऱ्यांकडून माहिती मिळाल्यावर, ३) जिल्हाधिकारी किंवा अधिकार प्रदान केलेल्या तहसीलदारांच्या हुकूमानंतर किंवा ४) स्थानिक चौकशीचा अहवाल तहसीलदारांकडे पाठवल्यावर, ज्या संबंधात वर्दी आली नाही,

**अशा प्रकरणाचा तहसीलदारांनी हुकूम केल्यावरच फक्त फेरफारात बदल होऊ शकतो. मात्र ह्या मार्गाचा गैरवापर होण्याची किंवा होत असण्याची शक्यता कशी असते, ते आपण आता पाहूया-**






# जातकर्म,पालखारोहण व नामकरण संस्कार

अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

स्त्रीच्या प्रसूतीनंतर त्वरितच तिच्या पतीने जातकर्म संस्कार करावा. पतीच्या अनुपस्थितीत किंवा प्रसूतीपूर्वी पतीचे निधन झाले असता कुटुंबातील स्त्रीचा दीर, सासरे वगैरेंपैकी कर्त्या पुरुषाने जातकर्म करावे. जातकर्म करण्यासाठी जननाशौच व मृताशौच पाळण्याची आवश्यकता नाही. बालकाची प्रसूती होताच त्वरित जातकर्म करावे असे सुचित केले गेले आहे.

अलीकडे बहुतांशी प्रसूती घरी न होता सुतिका गृहात होत असते. त्यामुळे हे साध्य होत नाही. असे असताना मुलाचा जन्मलेल्या दिवसापासून बाराव्या दिवशी व मुलीचा तेराव्या दिवशी जातकर्म संस्कार करावा. जातकर्म संस्कार, कर्णवेध (कान टोचणे) संस्कार, पालखारोहण ( पाळण्यात घालणे) व नामकरण हे सर्व संस्कार एकाच वेळी जन्मदिवसापासून मुलाचे बाराव्या दिवशी व मुलीचे तेराव्या दिवशी करता येतात. हे संस्कार मंत्रोच्चार व शास्त्रोक्त विधीने करावेत. यासाठी शास्त्रानुसार विधीने मार्गदर्शन करणारे योग्य असे तज्ञ गुरुजी योजावेत हे योग्य.

जातक संस्कार हा गर्भातील पाणी पिण्यामुळे जे काही दोष बालकाला लागलेले असतात ते नाहीसे करण्यासाठी केला जातो. या संस्कारामुळे बालकाला दीर्घायुष्य लाभते, त्याच्या तात्कालीक ग्रहपिडा नष्ट होतात त्याचप्रमाणे प्रसूत झालेल्या स्त्रीचे अशुभत्वाचे दोष नाहीसे होतात. हा जातकर्म संस्कार मृग, चित्रा, रेवती, अनुराधा, रोहिणी, उत्तरा, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, श्रवण, स्वाती, शततारका, धनिष्ठा, पुनर्वसू, अश्विनी, हस्त, पुष्य तसेच अभिजीत या नक्षत्रात चंद्र असताना करावा.




संस्काराच्या वेळी गुरु, चंद्र व शुक्र हे ग्रह अस्तंगत (सूर्याच्या अंशात्मक सानिध्यात) नसावेत. सूर्याचे उत्तरायण असणे उत्तम. चतुर्थी, नवमी व चतुर्दशी या रिक्ता तिथी नसाव्यात. मंगळवार, शनिवार, विष्टी (भद्रा) करण तसेच वैधृती हे योग अशा प्रकारचे अशुभ योग असू नयेत. लग्नशुद्धी असावी. कन्या व पुत्र दोघांच्याही संस्काराची पद्धत सारखीच आहे फक्त जन्म दिवसापासून पुत्राचा संस्कार सम दिवशी करावा व कन्येचा संस्कार विषम दिवशी करावा. तज्ञ ज्योतिषी व पुरोहित यांची पूजा करून त्यांना यथाशक्ती दानधर्म करून त्यांच्या मार्गदर्शनाने विधी करावेत हे उत्तम जेणेकरून सर्व विधी शास्त्रोक्त ज्ञानाने होऊ शकतील.

शास्त्रोक्त विधीनुसार संस्कार कर्मात पुण्याहवाचन, मातृका पूजन व नांदी श्राद्ध ही कर्मे करणे अपेक्षित व उत्तम फलदायी होत. पाचव्या व सहाव्या दिवशी कुलदेवतेचे व षष्ठी देवतेचे (सटवाईचे) शोडषोपचारे अथवा पंचोपचारे पूजन करावे.

' पुत्राला जन्मदिवसापासून बाराव्या दिवशी व कन्येला तेराव्या दिवशी पाळण्यात घालणे (पालखारोहण करणे) योग्य असते '. बहुतांशी पालखारोहणाचा हा कार्यक्रम दुपारनंतर केला जातो हे योग्य नाही. दुपारनंतरचा ' अपराह्णकाळ ' हा अनिष्ट असतो. यावेळी बालकास पाळण्यात घालणे योग्य नसते. माध्याह्नापूर्वी बालकास पाळण्यात घलणे हे अधिक प्रशस्त असते.मध्याह्नकाली मध्यम व सायंकाळी कनिष्ठ असते. प्रशस्त काळाचे ज्योतिष्याकडून मुहूर्त काढून घेऊन त्यावर तज्ञ पुरोहिताच्या मार्गदर्शनाने पालखारोहण संस्कार करणे उत्तम.



बहुतांशी पालखारोहण संस्काराच्या वेळी (पाळण्यात घालताना) बालकाचे नाव ठेवण्याची पद्धती रूढ आहे. बालकाला ठेवावयाची नावे ही पुढीलप्रमाणे चार प्रकारची आहेत.


**१) देवभक्त नाव :** एखाद्या देव-देवतेचा भक्त असल्याप्रमाणे हे नाव असावे. उदाहरणार्थ रामदास, कृष्णदास, राधिका, शिवानी, रुद्राणी, प्रल्हाद .. याप्रमाणे.

**२) मास नाव** : बालकाचा जन्म चैत्र महिन्यात असल्यास ' वैकुंठ 'असे नाव ठेवावे, वैशाखात असल्यास ' जनार्दन ', ज्येष्ठात असल्यास ' उपेंद्र ', आषाढात असल्यास ' यज्ञपुरुष ', श्रावणात असल्यास ' वासुदेव ', भाद्रपदात असल्यास ' हरी ', आश्विनात असल्यास ' योगेश ', कार्तिकात असल्यास ' पुंडरिकाक्ष ', मार्गशीर्षात असल्यास ' कृष्ण ', पौषात असल्यास ' अनंत ', माघात असल्यास ' अच्युत ' आणि फाल्गुन महिन्यात असल्यास ' चक्री ' याप्रमाणे ज्या मराठी महिन्यात बालकाचा जन्म असेल त्याप्रमाणे मासनाव ठेवावे. यासाठी बालिकेच्या संदर्भात काही स्त्रीसुचक नावांचा वेगळा उल्लेख आढळत नाही असे तज्ञांचे म्हणणे आहे.

**३) नक्षत्र नाव :** बालकाचा जन्म ज्या नक्षत्रावर झालेला आहे त्या नक्षत्रानुसार जी चार अक्षरे सूचित केली जातात त्यांपैकी एका अक्षरावरून नाव ठेवावे. नक्षत्राच्या चार चरणांपैकी ज्या चरणावर बालकाचा जन्म झालेला आहे त्या चरणाचे अक्षर नावाच्या आरंभी घेणे अधिक प्रशस्त मानले गेले आहे. बालकाच्या नावातील हे नक्षत्र अक्षर बालकाला आयुष्यात शुभमंत्रासारखे फलप्राप्ती देणारे असते असा शास्त्रसंकेत आहे.

**४) व्यावहारिक नाव :** बालकाचे व्यवहारिक नाव निवडताना तारतम्याने निवडावे. मुलाच्या नावात २,४,६,.. अशी सम अक्षरे असावीत व मुलीच्या नावात ३,५,७,.. अशी विषमअक्षरे असावीत. नावात व्युत्पत्तीशास्त्रानुसार योग्य अर्थ असावा. अर्थहीन नावे किंवा अनिष्ट अर्थाची नावे ठेवू नयेत. नावाचा दोन अक्षरी अपभ्रंश होणार नाही याची दक्षता घ्यावी उदाहरणार्थ ' मधुकर ' नावाचे ' मध्या ' असे अपभ्रंशात्मक उच्चारण होते. अशा अपभ्रंशात्मक नावाने पुढे त्या बालकास हाक मारली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

नामकरणासाठी गुरुजी उपलब्ध न झाल्यास एका ताम्हणात तांदूळ घेऊन सोन्याच्या तारेने किंवा किंवा अंगठीने त्या तांदळामध्ये गणेश, इष्ट देवता, कुलदेवता, ग्रामदेवता, षष्ठी देवता (सटवाई) इत्यादी देवांची नावे लिहून त्याबरोबरच बालकाचे ठेवण्यात येणारे नाव लिहावे. या सर्व नावांचे पंचोपचारे पूजन करावे. त्यातील बालकास ठेवण्याचे नाव बालकाच्या कानात तीन वेळा मोठ्याने उच्चार करून सांगावे. त्यानंतर ' भद्रं कर्णेभि...' इत्यादी मंत्र किंवा आपणास येत असलेले कोणतेही गणेशस्तोत्र म्हणावे. पाळणागीते म्हणावीत.




# गड किल्ले बांधकामात मुक्या प्राण्यांचा ही मोलाचा वाटा.



'गड किल्ल्याचे स्थापत्य शास्त्र'


लेखक : विलास भि. कोळी
संपर्क. 9763 08 4499
kolivilas2@gmail.com

गड किल्ले बांधकामाच्या उभारणीत असंख्य हातांची सेवा तरी आहेचं. त्याही पलीकडे जावून एकजुटीचे भक्कम प्रतीक आहे. गड किल्ले बांधकामाच्या उभारणीत मनुष्याबरोबरच मुके पाळीव प्राणी म्हणजे बैल, हत्ती, घोडे, गाढव, खेचर यांचे योगदान खूप मोलाचे ठरलेले आहे. सुरू असलेल्या कामासाठी दगड, विटा, माती, लाकूड, चुना असे आवश्यक ते सर्व अवजड साहित्य आपल्या पाठीवरून वाहून नेण्यात गाढवांचा ताफा आघाडीवर असे. गाढवांकडून खाली मान घालून केल्या जाणाऱ्या या सेवेचे खूप वेगळेपण आहे. आणि ऐतिहासिक बांधकामात एक एक चिरा त्यांच्याही कष्टातून रचलेला आहे. हे सूक्ष्म अभ्यासांती व विचारांती लक्षात येते.

त्याकाळी सर्वात कठीण काम होते ते खदानी मधून काढलेली माती, वाळू, चुना असे साहित्य बांधकामाच्या जवळ ओझी वाहून नेण्याचे. किंवा बांधकामातील पायाच्या खोदाईमधील माती, मुरूम वाहून बाहेर टाकण्याचे. कोणतेही आधुनिक यंत्र नसताना म्हणजे आताचे सारखे जेसीबी, पोकलेन, डंपर, मालट्रक, टॅक्टर नव्हते. असे अवजड साहित्य वाहून नेण्यासाठी गाढवांच्या वापराचा पर्याय होता. त्यांच्या अंगी असलेला काटकपणा, चिकाटी आणि सहनशीलता या गुणांमुळे गाढवं उपयुक्त ठरलेली आहेत. कठीण मार्गावरून दूर अंतरावर जड ओझी वाहून नेण्याच्या कामी त्यांचा फार उपयोग होत असे. भर उन्हात आणि प्रतिकूल परस्थितीत देखील ती कणखरपणे काम करतात.पूर्वीच्या काळापासूनच गाढवांच्याकडून ओझे वाहून नेण्याचे काम करून घेतले जात असे.

अशा कामासाठी पंचवीस गाढवा पासून दोनशे दोनशे गाढवांचा ताफा असे. बांधकाम साहित्य गाढवाच्या पाठीवर लादले की ठरलेल्या ठिकाणी ते ओझे घेऊन गाढव जाते. तिथे उभ्या असलेल्या माणसाकडून त्याच्या पाठीवरील ओझे उतरवून घेतले की परत गाढव न थांबता ठरलेल्या ठिकाणी येत असे. त्यांना हाकण्यासाठी माणसांची गरज नसे. अशा पद्धतीने त्याच्या फेऱ्या होत असत. गाढवावर त्याच्या ताकदी नुसार ओझे लादले जाते. एकदा त्याने पाठीवर ओझे घेतली की. मध्ये वाटेत कुठेही बसत नाही. पण तरीही गाढव राबते म्हणून त्याला कितीही राबवून घ्यायचे नाही म्हणून गाढवाकडून सकाळी दोनतिन तास व दुपारी उंन कमी झाल्यावर दोनतिन तास काम करून घेतले जाते.





जुन्या बांधकामात गाढवांचे योगदान खूप मोठे आहे. पण सरळ काम न करणाऱ्याला गाढव म्हणून उपमा देतो. पण चित्र वेगळे आहे. गाढव खूप सरळपणे कष्टाचे काम करते. आपल्या धन्याला उदरनिर्वाहासाठी मदत करते. जुन्या बांधकामात गाढवांच्या कष्टाची खरेच वेगळी नोंद ठेवावी लागेल असे प्रकर्षाने वाटते.

**बुरुज** हे गडकिल्ल्याचे महत्त्वाचे अंग. किल्ल्याच्या किंवा तटबंदीच्या चारी बाजूंच्या भिंती जोडणाऱ्या भिंतीला बुरुज म्हणत असत. शत्रूच्या माऱ्यात बुरुज ढासळला म्हणजे किल्ल्यात शत्रूचा शिरकाव होणे सोपे होत असे. बुरूज पडल्यावर अनेक किल्ले शत्रूच्या ताब्यात सहजतेने गेल्याचे उदाहरणे आपल्याला इतिहासात आढळून येतात.

मानवाने अश्मयुगापासून प्राण्यांच्या शिंगाचा, नखांचा, कातड्याचा आणि खाण्यासाठी मांसाचा वापर केल्याचे आढळते. निरनिराळ्या प्राण्यांना दुधासाठी, शिकारीसाठी, युद्धासाठी, शेतीसाठी आणि मनोरंजनासाठी वापरल्याचे आपण पहात आलो आहोत. प्राण्यांवर निरनिराळे प्रयोग करून मानवाने अनेक संशोधन केली आहेत त्यातील काही मानव हिताचे तर काही अहिताचे ठरले. युद्धासाठी घोडे, हत्ती, बैल, कुत्रा यांचा वापर केला गेला आहे. घोडदलातील घोडी, हत्तीदलातील हत्ती, मालवाहतूक करणारे बैल, नेमक्या ठिकाणाचा माग काढणारा कुत्रा हे जुन्या काळातील काही उदाहरणे आहेत. हत्तीवर/ उंटावर तोफ ठेऊन शत्रूवर डागली जायची अशी ही उदाहरण आहे. हत्तीच्या पायाखाली देऊन शत्रूला आणि फितुराला ठार मारणे अशा सजा देणे, गाडी ओढण्यासाठी बैल/ रेडा/ हत्ती /घोडा यांचा वापर करणे.

मनोरंजनासाठी प्राण्यांच्या टकरा, झुंजी शर्यती पूर्वी होत असतं. बकऱ्याच्या, रेड्याच्या, हत्तीच्या टकरी, कोंबड्याच्या झुंजी. कुत्र्याच्या, म्हशीच्या, घोड्यांच्या, बैलगाड्यांच्या शर्यती होत असत. युद्ध, शिकार या बरोबर शेतीविषयक काम तसेच इतर कामात मदत म्हणून मानवाने अनेक प्राण्याचा वापर केला आहे. जसे दुधासाठी गाय, म्हैस, शेळी. औतासाठी, बैलगाडीसाठी, तेलाच्या घाण्यासाठी बैल रेडा. राखणीसाठी कुत्रा, घरात मांजर, पोपट, कोंबड्या इत्यादींचा वापर सर्रास आहे.






# सरकारी योजना/नोकरी

## श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना

**क्षेत्र: सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग**

**लाभार्थी:**

**गट (अ) :-**
**65 व 65 वर्षावरील व दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव समाविष्ट असणाऱ्याव्यक्तीना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट (अ) मधून रु.400/- प्रतिमहिना निवृत्तीवेतन देण्यात येते याच लाभार्थ्याला केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेचे रु.200/- प्रतिमहा प्रति लाभार्थी निवृत्तीवेतन दिले जाते.**

**यामुळे या लाभार्थ्यांना राज्य शासनाकडून रु.400/- प्रतिमहा व केंद्र शासनाकडून रु.200/- प्रतिमहा असे एकूण रु.600/- प्रतिमहा प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन मिळते.**

**गट (ब):-**
**या योजनेतंर्गत ज्या व्यक्तीचे वय 65 व 65 वर्षावरील आहे व ज्यांचे कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रुपये 21,000/- च्या आत आहे, अशा वृध्दांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (गट- ब) मध्ये रुपये 600/- प्रतिमहा प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन राज्य शासनाकडून देण्यात येते.**

**फायदे:**
**प्रतिमहा प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन रु.600/- अदा करण्यात येते.**

**अर्ज कसा करावा**

**अर्जदार जिल्हाधिकारी कार्यालय/ तहसलिदार संजय गांधी योजना/तलाठी कार्यालय या ठिकाणी अर्ज करु शकतो .**

**संपर्क कार्यालयाचे नाव-**
**जिल्हाधिकारी कार्यालय/ तहसलिदार संजय गांधी योजना/तलाठी कार्यालय किंवा भेट द्या https://sjsa.maharashtra.gov.in/mr/scheme-category/special-assistance**




## महिला उद्योगिनी योजना

**महिला उद्योगिनी योजना ही केंद्र सरकारने सुरू केलेली योजना आहे. या योजनेद्वारे महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेत कर्ज, प्रशिक्षण, आणि अनुदान यांचा समावेश होतो.**

### महिला उद्योगिनी योजनेचे फायदे:

- **महिलांना व्याजमुक्त कर्ज मिळू शकते.**
- **कौशल्य विकास प्रशिक्षण मिळते.**
- **लहान व्यवसाय स्थापन करण्यासाठी आणि वाढवण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळते.**
- **बँकांमार्फत व्यावसायिक उपक्रम/सूक्ष्म उपक्रम राबविण्यासाठी कर्जावर सबसिडीची तरतूद आहे.**

### महिला उद्योगिनी योजनेची वैशिष्ट्ये:

- **या योजनेत ८८ प्रकारचे व्यवसाय सुरु करण्यासाठी महिलांना कर्ज उपलब्ध होतं.**
- **या योजनेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, शारीरिक दृष्ट्या विकलांग, विधवा अशा सर्व स्त्रियांना बिनव्याजी कर्ज मिळते.**
- **या योजनेत कर्ज सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका (RRB) आणि व्यावसायिक बँका यांसारख्या विविध वित्तीय संस्थांद्वारे दिले जाते.**
- **या योजनेत अर्ज बँकेच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे.**

### महिलांसाठी सरकारने आणलेली 'उद्योगिनी' योजना नेमकी काय आहे

- **24 Sept 2024 — Udyogini Scheme : उद्योगिनी ही योजना केंद्र सरकारने सुरु केली आहे. महिलांना व्यवसायासाठी कर्ज मिळावं म्हणून ही योजना आणण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ८८ प्रकारचे व्यवसाय सुरु करण्या...**

- **myscheme.gov.in**

-



**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

**आठवणीतील व्यक्तिमत्वे**



राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# अशोक हिरामण अभंगे- दूरदृष्टीने जगणारे कलाकार

मनात जिद्द चिकाटी,मेहनत करण्याची क्षमता महत्त्वाकांक्षा असेल तर दिव्यांग सुद्धा उच्च पदाला गेल्याचं पाहतो तेव्हां अशा व्यक्तीला आदराने सलाम करावा वाटतो.जन्मास आलेला जीव कसाही जगतो पण प्रसंगावर मात करून स्वाभिमानान जगणं, नुसतं जगणं नव्हे तर नावलौकिक करून समाजात ताठ मानेन वावरण काय असतं ते बुद्ध, फुले, शाहू आंबेडकरी चळवळीतील एक ज्येष्ठ कलावंत कवी गायक गझलकार अशोक हिरामण अभंगे यांच्या विषयी थोडक्यात माहिती.

अशोक हिरामण अभंगे यांचा जन्म तेवीस नोव्हेंबर एकोणीसशे चौपन्नचा. वडील हिरामण अभंगे हे चळवळीतील कलावंत. ज्यांनी धर्मांतर पूर्व चळवळीत डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांचे विचार खेडोपाडी आपल्या कवनातून मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यात आणि त्यापलीकडे कवनातून पोहचविले. आणि धर्मांतर नंतर "आदर्श गायन पार्टी"निर्माण करून बुद्ध धम्म प्रसार प्रचार नी बाबासाहेबांचे विचार १९८५सालापर्यंत पोहचविले. पत्नी शांताबाई यांची साथ होती. रायगड जिल्ह्यात काव्यरत्न वामनदादा कर्डक यांची गीते गाणारे पहिले गायक. दादांची गीते गाता गाता ते स्वतःही लेखन करु लागले. तत्कालिन ज्येष्ठ गायक गायिका सोबत त्यांनी गीत गायनाचे हजारो कार्यक्रम केले. कलेच्या साथीनं तीन मुलगे चार मुलांचं योग्य संगोपन केलं . त्यांना शिक्षणं दिलं. रायगड जिल्ह्यात कर्जत तालुक्यात मुक्काम भडवळ, नेरळ हे मूळ गावं. अशा या महान कलावंत आणि आई शांताबाई पोटी अशोक अभंगे यांचा जन्म झाला.

सर्वं सामान्य मूल जसं जन्मास येतं तसाच यांचा जन्म. पण वयाच्या दहाव्या अकराव्या वर्षीच यांची दृष्टी कमी आली. आई वडिलांनी प्रयत्नांची शर्थ केली पण निसर्गापुढे प्रयत्न उपचार यांची हार झाली. यामुळं आई वडील खचले नाहीत, भावंड पाठीशी ठाम उभी राहिलीच त्याबरोबरच बाल वयात हा नैसर्गिक आघात झाला तरी या अशोकाने कोणत्याही प्रकारे खच्चून न जाता शिकण्याचा नी कुटुंबाने शिकविण्याचा निर्धार केला. आपल्या नातेवाईक यांच्याकडे १९८०ते १९८५पर्यंत नागपूर बौद्ध धरमपेठ तुलानी चौक येथे राहून शिक्षणं घेऊन ते संगीत विशारद, तबला विशारद झाले. आज ते अलिबाग रायगड येथून तबला शिक्षक म्हणून अलिबाग येथील महात्मा गांधी विद्यालयातून तीस वर्षाच्या सेवेतून आता निवृत्त आहेत .

ते आज निवृत असले तरी त्यांनी मिळविलेली किर्ती मान सन्मान डोळस असणाऱ्या करिता खूपच प्रेरणादायी आहे. अचानक आलेल्या अंधत्वा मुळे शालेय शिक्षण बंद झाले व 1974-1987 पर्यंत संगीत शिक्षणाचे मुंबईत व बुटी संगीत विद्यालय नागपूर येथे अध्ययन पूर्ण केले.. 1983 मध्ये संगीत विशारद व 1990 मध्ये तबला विशारद.. वडील हिरामण अभंगे यांनी स्थापित केलेल्या 'अभंगे आणि पार्टी' च्या माध्यमातून कव्वाली व 'भीमस्तुती' व बुध्दवाणी च्या माध्यमातून गेली 40 वर्षे प्रबोधनाचे कार्यक्रम करत आहेत.

'अपंग मैत्री मुंबई' या संस्थे कडून 1988 मध्ये आदर्श अंध शिक्षक पुरस्कार... 1994 मध्ये 'बहर' या स्वरचित काव्य संग्रहाचे मा. शंकर वैद्य यांच्या हस्ते प्रकाशन झाले त्याची प्रस्तावना ज्येष्ठ गीतकार कवी प्रविण दवणे यांनी लिहिली आहे.

- **1997 व 98 सलग दोन वर्षे 'भवतु सब्ब मंगलम' या मुंबई मधील संस्थे कडून 'दया पवार पुरस्कार'**
- **25 फेब्रुवारी 2005 मध्ये इंदोर येथील अनोखा विश्वास या मासीका तर्फे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर संगीतरत्न पुरस्कार '**
- **2005 मध्ये फुले आंबेडकर साहित्य संमेलनात 'प्रल्हाद शिंदे गायन पुरस्कार'**
- **2005 साली रायगड जिल्हा परिषदेचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार'**
- **2009 मध्ये मुंबई केंद्र आकाशवाणी वर अस्मिता वाहिनीवरील 'साहित्य सौरभ' या कार्यक्रमात काव्य वाचनाचा कार्यक्रम झाला..**
- **'नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड' या संस्थेचा 15/12/2011 साली शिक्षण महर्षी डॉ.विश्वनाथ कराड यांच्या हस्ते 'आदर्श अंध शिक्षक पुरस्कार'**
- **27/12/2011 रोजी 'रायगड भूषण' पुरस्कार**
- **2019- अलिबाग येथे उत्कृष्ट संगीत दिग्दर्शन यासाठी पी.एन.पी कलागौरव पुरस्कार**
- **17/12/2019- मधुबन कट्टा -कोकण मराठी साहित्य परिषद उरण आयोजित राज्यस्तरीय काव्य वाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक**
- **4/12/2021- 94वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नाशिक येथे कवितेचे सादरीकरण केले.**

या महान कलावंत विषयी प्रख्यात कवी गायिका मैनाताई माणिक कोकाटे या उभयतां कडून ऐकून होतोच. त्या बरोबर महाड येथील ज्येष्ठ कवी नानासाहेब तथा मारूती सकपाळ निवृत सर्कल अधिकारी यांच्याकडून माहिती आणि फोन घेऊन संपर्क केला. माझा फोन नावं ऐकून दादासाहेब अभंगे यांना आनंद झाला.

फोन करताच मध्येच थांबून तीन वेळा फोन करून जवळपास दीड तास त्यांच्याशी गप्पा मारल्या माहिती ऐकली. आपल्या या यशाचं आई वडील, मी अंध असून माझ्याशी विवाह केला मला आज मीतीस चाळीस वर्ष साथ देत आहे ती पत्नी सुलक्षणा माहेरच नावं सुरेखा हिची अनमोल साथ लाभली. चार मुलांसह तिनं



माझा सुखाचा संसार सांभाळला आहे. मुलगे विशाल, सुशिल, मुलगी प्रज्ञा करुणा यांनी उच्च शिक्षणं नी कला वारसा घेतला असून तबला, हार्मोनियम मधील विशारद, गायक आहेत."जपून चालव होडी,"रामदास निघाली रेवस बंदराला, बापासाठी तरी एक व्हा अशी मी मुलींन गाणी गायली आहेत. भावंडांनी ज्याअलिबाग होशिवरे गावात नोकरी केली तिथले, ग्रामस्थ, पालक शाळेचे मुख्याध्यापक सहकारी, अधिकारी, कला कार्यात प्रभाकर देसकर, पिटळवार, छापेकर, शुभदाबाई पराडकर,वि. ग. कोवळेकर, मला कार्यक्रम देणारं आयोजक, ज्यांनी माझ्या सोबत कार्यक्रम केले ते प्रतिस्पर्धी, सहकारी, आपल्या मुलांचेही त्यांनी आभार व्यक्त केले. जरी दृष्टी नसली तरी आपल्या लेखणी वाणीतून डोळस व्यक्तीला दूरदृष्टी देणारे अभंगे दादा लिहितात

**"तू लढताना तुझ्या हाताना**
**चाटून गेले ओठ आगीचे**
**तू जळताना चिता भडकली**
**किती उसळे लोट आगीचे"**
**भय जळण्याचे नव्हते केव्हां**
**हे दलितांच्या निर्भय सिंहां**
**तूच क्रांतीचा सूर्य तळपता**
**पचवित जगला घोट आगीचे"**
**ही भूमी गौतमाची आहे**
**लोकशाही भीमाची आहे**
**कोटी कोटी या लेकरासाठी**
**सावली त्या रमाची आहे "**
**"शोकांतिका तुझी भीमा उमटतेसुरातुनी**
**एक एक दूर चालला**
**भरल्या घरातूनी "**
**जाता जाता बोलले बाबा**
**घर हे माझे फोडू नका**
**एक विचाराने रे वागा**
**मन कुणाचे मोडू नका "**

अशी एकापेक्षाही एक सरस गीते लिहून, गाऊन आपल्या अंधत्वाचा बाहू न करता धैर्याने, शौर्याने जीवन घडवून कुटूंब घडवून वयाची सत्तरी ओलांडणारे अभंगे दादांनी कलेतून सर्वांना दूरदृष्टी देण्याचा नी स्वतः दूरदृष्टीने जगण्याला पन्नास वर्षाहून जादा काल, वेळ दिला. त्यात ते उत्तम प्रकारे यशस्वी झाले आहेत.समाधानी आहेत.त्यांच्या मनी एकच दुःख आहे . मोठा मुलगा विशालच्या ३४व्या वर्षी आकस्मिक जाण्याने , आणि मोठे बंधू साहित्यिक लक्ष्मण अभंगे धाकटा बंधू अरुण अभंगे यांच्या निधनाने ते मनाने खचले तरी डॉ.बाबासाहेबांच्या त्यागामुळे, आम्ही सुस्थितीत आहोत. बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या या कवीला दीर्घायुष्य लाभो, स्वतः दृष्टीहीन असून अनेक विद्यार्थ्यांना गायन वादनात विशारद केले हाच त्यांच्या आयुष्यात मोठा सन्मान आहे.पुढील जीवनासाठी लाख लाख शुभेच्छा देतो.

# लतिकाची हळद

## मालवणी बोली



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.



सासुबायबरोबर गजालेक बसलली परबीन अचानक उठली. ' आईनु, मी जातय. माका आता आठावला. चिंदराक जावचा हा. आज सांचेक लतिकाची हळद आसा. कालच माका फोन करून सांगल्यान व्हता, वयनी तुम्ही हळदीक येवकच व्हया. अगे बाये, आता धांदल व्हतली. कसा आवरु? ' असा म्हणत परबीन उठली नि वाटेक लागली तसो सासुबाय तिचो हात धरल्यान आणि परत खाली वळयत बसवल्यान. 'जाशीत गे परबीनी. पण हळद म्हणजे काय कार्यक्रम तो तरी सांग माका.मी बाय हल्ली कितक्या वरसात हळदीक जावक नाय खडे. कारण हल्ली हळदीचो म्हणजे पुण्यवचनाचो कार्यक्रम होता तरी खडे?' तशी परबीन म्हणाली,' आईनु, हळद म्हणजे काय विचारतास.... मोठो इव्हेंट असता तो. मस्त डेकोरेशन करतत. मोठे डीजे लावतत. धावणारे, लखलखणारे रंगीत रंगीत हॅलोजन लावतत. सगळेजण पिवळ्या रंगाचे कपडे घालतत. मगे न्हवरेक हळद फासतत, एकमेकांक हळद फासतत. पुरी रातभर मस्त धुमशान असता. कोंबडी, बोकड, मटाण, दारु, बियर, काय म्हणशात ता..... अहो, नाचणाऱ्यांक जागा नाय पुरना नि समोर कोण ताय नाय दिसना.' सासुबायच्या तोंडात अचानक गाळी इले.' शीरा पडली अशी असता काय तुमची हळद? दारू खावन, मटणा खावन धुमशान घालतास.... ही कसली तुमची नवी प्रथा? ही कसली तुमची संस्कृती? गे बाय माझे, सध्याच्या जमान्यात काय काय नि असले कसले कसले इव्हेंट बघूचे नशिबात इले बाय माझे. तशी परबीन म्हणाली,' आईनु, काळ बदाललो आता. आपण पण बदलूक व्हया काळाबरोबर. जुना ता सोना करीत ऱ्हवलास तर थयसरच ऱ्हवतलास ना ओ.'

तशी परबीनीची समजूत घालीत सासुबाय म्हणाली, ' परबीनी, अगे हळद ह्यो खरो तर लग्न विधितलो प्रमुख आणि पवित्र उपविधी असता. आम्ही त्या विधीक पुण्यवचन म्हणत असू. पुण्यवचन म्हणजे काय सांगा तुका... लग्नाच्या आदल्या रात्री जेवण खावण सगळी भावकी, पै पावणे न्हवरेच्या मांडवात जमतत. भटजी असतत. वाजंत्री असतत. भटजी पुण्यवचनाच्या विधीची मांडणी करतत. न्हवरीचो मामा, मामी खास हजर असता. भटजींच्या मंत्रोच्चारात सगळे धार्मिक विधी पार पडतत. यजमान, यजमानीन, न्हवरीच्या हस्ते पूजाविधी होतत. मगे मानाचे सुवासिनी बायका आंब्याच्या पानाच्या देठांनी न्हवरेक हळद लावतत. तेव्हाय भटजींचे मंत्रोच्चार सुरुच असतत. मगे कुळाची पूजा व्हता. आंब्याच्या टाळाची पूजा व्हता, सावरीच्या खांबाची पूजा व्हता.देवघरात देवक ठेवला जाता. ह्या सगळा झाल्यावर रोवळेत तांदूळ घेवन पाच सुवासिनी बायका घाणे भरतत. रोवळेत मुसळा घालून सडल्यासारख्या करीत पारंपारिक ओवयें म्हणतत. किती मस्त, शांत नि सात्विक कार्यक्रम वाटता तो! मगे न्हवरी मुलगी, देवादिकांच्या, पै पावण्यांच्या, मामा-मामीच्या पाया पडता. ह्यो सगळो कार्यक्रम सुरु असताना वाजंत्री मस्त पारंपारिक वाद्य वाजवीत असतत. तासा दोन तासांचो ह्यो विधी. ह्येका आम्ही पुर्वी हळदीचो किंवा पुण्यवचनाचो कार्यक्रम म्हणत असू.'

माझ्या सासुबायन अनुभवलेले तसे हळदीचे सात्विक व धार्मिक कार्यक्रम खरोखर आमच्यासारख्यांक विचार करूक लावतत. रातभर नाचून धुमशान करना, शेजाऱ्यापाजाऱ्यांची झोप उडवना, मटणा दारु खाणा, मोठमोठे डीजे लावणा, लायटींग करणा, रातभर जागरण करून, दारु खावन सुजलेला तॉन्ड दाखवीत परत सकाळी लग्नात मिरवणा खरोखर चांगला वाटता काय ओ? सोयन विचार करून सांगा.



# बाथरूमसाठी वास्तु टिप्स

बाथरूम हे घरातील एक महत्त्वाचे अंग असून, वास्तुशास्त्रानुसार योग्य दिशेत आणि योग्य पद्धतीने बांधले गेले, तर घरातील सकारात्मक ऊर्जा टिकून राहते. खालील काही वास्तुशास्त्रानुसार बाथरूमसाठी महत्त्वाच्या टिप्स दिल्या आहेत:

**१. बाथरूमची योग्य दिशा:**

✓ ईशान्य (उत्तर-पूर्व) दिशेला बाथरूम टाळावा, कारण ही दिशा पवित्र मानली जाते.

✓ बाथरूमसाठी पश्चिम किंवा वायव्य (उत्तर-पश्चिम) दिशा सर्वोत्तम मानली जाते.

✓ दक्षिण दिशेला बाथरूम असल्यास शक्यतो टाळावे, परंतु असल्यास योग्य उपाय करावेत.

२. बाथरूमचे दरवाजे आणि खिडक्या:

✓ बाथरूमचा दरवाजा नेहमी पूर्व किंवा उत्तर दिशेला असावा.

✓ लाकडी दरवाजा वापरणे शुभ असते, धातूचा दरवाजा नकारात्मक ऊर्जा निर्माण करतो.

✓ बाथरूममध्ये पूर्व किंवा उत्तर भिंतीवर खिडकी असावी, ज्यामुळे नैसर्गिक प्रकाश आणि हवा खेळती राहील.

३. बाथरूममधील पाण्याचा निचरा:

✓ बाथरूममधील पाण्याचा निचरा उत्तर, उत्तर-पूर्व किंवा पूर्व दिशेकडे असावा.

✓ जमिनीचा उतार नेहमी उत्तर किंवा पूर्व दिशेकडे ठेवावा.

४. बाथरूममधील आरसा (Mirror) आणि बेसिन:

✓ बाथरूममधील आरसा उत्तर किंवा पूर्व भिंतीवर लावावा.

✓ हात धुण्यासाठीचे बेसिनसुद्धा उत्तरेस किंवा पूर्वेस असावे.

५. कमोड (Toilet Seat) च्या योग्य दिशा:

✓ वायव्य (North-West) किंवा पश्चिम दिशेला टॉयलेट बनवावे.

✓ कमोडवर बसताना तोंड उत्तर किंवा पश्चिम दिशेकडे असावे.

पान १३ वर.



## फ्रेंच टोस्ट



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**आज आपण फ्रेंच टोस्ट ही एक चविष्ट डिश आहे अशा या फ्रेंच टोस्टची रेसिपी सोपी आहे. चला, तयार करूया.**

**साहित्य**

- ४ ब्रेडच्या स्लाईस
- २ अंडी
- १/२ कप दूध
- २ टेबलस्पून साखर
- १ टीस्पून व्हॅनिला इसेन्स (ऐच्छिक)
- १/२ टीस्पून दालचिनी पावडर (ऐच्छिक)
- १ चिमूट मीठ
- २ टेबलस्पून बटर किंवा तूप
- मध किंवा चॉकलेट सिरप (सजावटीसाठी):

**कृती:**

- एका मोठ्या बाऊलमध्ये अंडी फोडून घ्या. त्यात दूध, साखर, व्हॅनिला इसेन्स, दालचिनी पावडर आणि मीठ घालून चांगले फेटून घ्या.
- ब्रेडच्या स्लाईसना या मिश्रणात ५-१० सेकंद बुडवून ठेवा, जेणेकरून ते चांगले मऊ होतील.
- तवा गरम करून त्यावर बटर किंवा तूप घाला.
- ब्रेडच्या स्लाईस तव्यावर ठेऊन दोन्ही बाजूंनी सोनेरी रंग येईपर्यंत मध्यम आचेवर शेकून घ्या.
- गरम गरम फ्रेंच टोस्ट प्लेटमध्ये काढा आणि त्यावर मध, चॉकलेट सिरप किंवा पिठीसाखर शिंपडा.
- सर्व्ह करण्यासाठी:
- फ्रेंच टोस्टसोबत फळांचे तु**कडे, साखर, मध किंवा चॉकलेट सिरप घालून सर्व्ह करा.**

## गोष्ट एका 'भंगारवाल्याची....!'



श्री. धनंजय शेटये
गोळवण.
9619222709

अठरा विश्व द्रारिद्रयात जीवन खितपत पडले होते. आजुबाजुला सार्वत्रिक गरीबीच उफाळलेली होती काय करावं? काही समजत नव्हते.दोन वेळचे अन्न दुरापास्त होते. पदरी एक लहान मुलगी होती. उदरनिर्वाहासाठी काही साधनच नव्हते. गावात राहुन दारोदार फिरूनही उपाशी राहण्यापेक्षा शहराची वाट धरावी असे मनोमन ठरवले. वाटेल त्या दिशेने जावे वाट्टेल तो कामधंदा करावा लहान लेकीला घेऊन कुठे गरीबीत खितपत राहायचे?? मुंबईचा रस्ता धरला. कधी कधी जात, धर्म,पंथ हा सुद्धा आपल्या जीवनात अडथळा निर्माण करतात. नको ती जात... नको तो धर्म असेही मनोमन वाटत राहते.पण काय करणार जन्माने आपल्याला धर्म मिळतो. कुठल्या धर्मात जन्म घ्यावा हे आपल्या हाती नसते. दैवाने आपला जन्म एखाद्या जातीत. एखाद्या धर्मात... एखाद्या पंथात झालेला असतो. पण शेवटी ते जातीचं बिरुद घेऊन आयुष्यभर खस्ता खाव्या लागतात. कधी कधी आपल्याला आपल्या धर्माने, जातीने, पंथाने ओळख निर्माण होते तर कधी कधी आपल्याला त्याच आपल्या धर्माचा जातीचा तिटकारा वाटतो.आपल्याच धर्माचा द्वेष वाटू लागतो. मग आपल्या अठरा विश्व द्रारिद्रयापुढे आपला धर्म, आपली जात नाईलाजास्तव लपवून पोटासाठी वणवण भटकावे लागते वाटेल ते काम करावे लागते. कधी कधी धर्म,जात उदरनिर्वाहासाठीच्या गोष्टींच्या आडवा येतो.मग आपण करणार तरी काय?

असाच एक बिस्मिल्ला अब्दुल चौधरी हजारो कोसांचा प्रवास पार करत महाराष्ट्रात दाखल झाला होता. धर्माने मुसलमान होता पण मनाने मात्र सर्वच धर्मांचा आपलेपणाने आदर करणारा होता. मुंबईसारख्या धकाधकीच्या जीवनात त्याला असहायता वाटू लागली. त्याने कोकण रेल्वेने कोकण गाठले. कोकणात एका ग्रामीण भागातील निसर्गरम्य परिसरात तंबू बांधून राहु लागला. कोकणातील माणसं नेहमीच प्रेमळपणे वागतात. एखाद्या गरीबाला जीव लावणारी... कोकणी माणूस आपण कीतीही गरीबीत असला तरी दुपारच्या जेवणाच्या वेळी दारी कोण अनोळखी फेरीवाला जरी दारी आला तरी फक्त पाणी नाही तर सरळ जेवणाचं ताट वाढेल. परक्याला दिलेला परोपकारी हात, हाच दिलेला जिव्हाळा कधी कधी कोकणी माणसांच्या चांगुलपणाचा घात करतो. तरीही कोकणी माणसांची कोणतीही तक्रार नसते. आपण नेहमी एखाद्याचे चांगलेच करणार तो जरी आपल्याला फसवत असला तरी तो देवाला फसवील आपल्याला नाही कारण आपण स्वच्छ मनाने एखाद्याला गरीब समजून सढळ हस्ते मदत करीत असतो. आपण तर कोणाचेच वाईट करीत नसतो. आपल्या चांगुलपणाचा कोणी फायदा घेतला तरी आपले पुण्याईचे कर्म कधीच फुकट जात नाही. त्यामुळे पुण्यकर्म करताना सत्यासत्यता पडताळून पाहण्याची गरज नसते. विधाता सर्वच गोष्टींचा लेखाजोखा ठेमानणारा गाव आहे.त्यामुळे गावात परप्रांतीय, परधर्मिय भंगारवाला एवढी वर्षे सलोख्याने राहु शकला होता. गावक-यांनी कधीच विरोधही केला नव्हता.तशी कधी गरजच भासली नव्हती.त्याच्या धर्माशी आपलं काही देणंघेणं नव्हतं. तसं त्याने आपल्या धर्माचं अवडंबरही माजवले नव्हते. धर्माच्या पेक्षा भीषण असा पोटापाण्यासाठी प्रश्न आ वासून उभा राहिला होता. दोनवेळचे अन्न कसे मिळवावे? वाट्टेल ते काम करण्यासाठीची जीद्द होती.वत असतो.त्याचा हिशोब कधीच चूकणार नाही. याच जन्मी करावे आणि याच जन्मी भोगावा हा दैवाचा विधिलिखित नियम आहे आणि आपले दैव कोणालाही आपल्या मर्जीने बदलता येण्यासारखे नाही.

धर्माने मुसलमान असलेला बिस्मिल्ला मनाने जणू हिंदूच बनला होता. त्या गावात एकही मुस्लीम बांधव नव्हता. बहुतांश लोक हिंदू धर्मीय व बौद्ध धर्मीय होते. या वेगवेगळ्या दोन धर्माचे लोक राहत असले तरी दोन्ही धर्माचे सण उत्सव हे एकत्र एखाद्या कुटुंबाप्रमाणे साजरे केले जातात.बौद्धधर्मीय समाजाने गावाच्या सांस्कृतिक, कलात्मक आणि शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट गुणवत्तेनं संस्कृती आणि परंपरा समृद्ध केली.अभिनय,गायन,वादन या कलेत बौद्ध धर्मीय समाजाने गावाला एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवले आहे.बौद्ध धर्मीयबांधवाचा ऐक्याचा महामेरू गावाच्या सामाजिक, शैक्षणिक समृद्धेचा आदर्श आहे. आमच्या लहानपणापासून आम्ही नाट्य,अभिनय,गायन ,वादन कला ह्या बौद्ध धर्मीय बांधवांच्या विविध गुणदर्शनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांतुन अनुभवत आलो. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव, शांतीदूत गौतम बुद्ध जयंती उत्सव यांसारख्या कार्यक्रमातुन आमच्या बालमनावर संस्कार घडत गेले. आजही धर्मापलिकडचे गावच्या ऐक्याचे बंधुभावाचे आमचे नाते नाते आहे. पण कधीही धार्मिक गालबोट लागलं नाही. आमचा गाव सर्वधर्मसमभाव मानणारा गाव आहे.त्यामुळे गावात परप्रांतीय, परधर्मिय भंगारवाला एवढी वर्षे सलोख्याने राहु शकला होता. गावक-यांनी कधीच विरोधही केला नव्हता.तशी कधी गरजच भासली नव्हती.त्याच्या धर्माशी आपलं काही देणंघेणं नव्हतं तसं त्याने आपल्या धर्माचं अवडंबरही माजवले नव्हते. धर्माच्या पेक्षा भीषण असा पोटापाण्यासाठी प्रश्न आ वासून उभा राहिला होता. दोनवेळचे अन्न कसे मिळवावे? वाट्टेल ते काम करण्यासाठीची जीद्द होती. प्रत्येकवेळी आपल्या छोट्या मुलींचा चेहरा नजरेसमोर उभा राहत होता. भंगार गोळा करण्याचे तो काम करु लागला. हळु हळु धंद्यात बरकत येऊ लागली.. तंबूत राहणारा बिस्मिल्ला आता एका पडक्या घराच्या आश्रयाला आला. गावात असे अनेक भटके लोक तात्पुरती तंबूघरे बांधून राहणारे वानरमारे, आदिवासी लोक भटकंती करत असतात तशीच या भंगार वाल्यांची गणती केली गेली. पण त्या भंगारवाल्याने गावातच बस्तान बसवले. एक वर्ष... दोन वर्ष असे करत तब्बल १० वर्षं होईपर्यंत तमाम गावकरी निद्रिस्त राहिले. तत्कालीन ग्रामपंचायत प्रशासनाने फारशी चौकशी केली नसावी. चूक ही चूक असताना काढावी मोठा 'खिळा' झाल्यावर काढुन काय उपयोग होत नसतो. पाणी डोक्यावरुन वाहुन गेले होते. त्यावेळी सुद्धा कोणत्या परिस्थितीत कोणता निर्णय घ्यावा लागला हे ती परिस्थिती जाणून घेतल्याशिवाय खरी परिस्थिती समजणार नाही. राजकारणात राहुन समाजकारण करताना सर्वांना समान लेखावे लागते.लोकांच्या हितासाठी सुखदु:खाच्या प्रसंगी आपलेपणाने मदत करताना नियमानुसार सर्वच करता येत नसतं. विरोधक अशा लोकांच्या चूका शोधण्यासाठी टपलेलेलेच असतात.कोणाचे हित होत आहे या पेक्षा आपला विरोधक कधी धुळीस मिळतो याची वाट पाहत असतात.आपलं ठेवावे झाकून आणि दुस-याचे पाहावे वाकून ही अवस्था असते. 'आपला तो बाब्या दुस-याचा तो कार्टया...!!'

भारताच्या स्वातंत्र्यानंतर देशात शैक्षणिक धोरणानुसार देशातील कोणत्याही मुलांना शिक्षणाच्या हक्कापासून वंचित ठेवता येत नाही.शिक्षणाचा सार्वत्रिक हक्क आहे. भाषिक प्रांतवार रचना असली तरीही भारताच्या राज्य घटनेनुसार कायदेशीरपणे देशाचा नागरिक आहे त्याला देशातील कोणत्याही प्रांतात नोकरी धंद्याच्या निमित्ताने जाण्याचा राहण्याचा अधिकार आहे.आज परप्रांतीय घुसखोरी असे वळण देऊन मोठा बिकट प्रश्न निर्माण केला आहे. गावकऱ्यांचे म्हणणे काहीअंशी बरोबरच होते. कोकण रेल्वेच्या आगमनानंतर बरेच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले तडीपार परप्रांतीय लोक कोकणातल्या गावी बस्तान मांडून चोरी, अत्याचार करु लागले. समृद्ध, संपन्न कोकणात ही कीड सामान्य जनजीवनास धोका निर्माण करु लागली.भ्रष्टाचाराच्या मार्गाने कागदपत्रांची एवढ्या जलदगतीने पूर्तता करुन देणारेही आपलेच असतील, शासनाच्या अनेक योजनांचा फायदा जर अशा परप्रांतीय घुसखोरी करणा-याना मिळत असेल आणि स्थानिक लोक अशा सरकारी योजनांना डावलले जात असतील तर मग स्थानिक लोक एकत्र येऊन भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवणार नाही तर मग काय करणार? टाहो फोडणार नाहीत तर काय करतील? परप्रांतीय लोकांना आधार कार्ड, नोंदणी पॅनकार्ड, रेशनकार्ड या गोष्टी कशा काय बनवून मिळू शकतात? हे भ्रष्टाचारी काम कुठे तरी थांबले पाहिजे. भाडेकरू म्हणून राहतोस राहा पण कोकणी माणसांच्या उरावर बसण्याचा प्रयत्न करु नकोस. परंपरा संस्कृती जपणा-या कोकणच्या भूमीत परप्रांतीयांच्या शिरकावामुळे गुन्हेगारी वाढत चालली आहे. दिवसाढवळ्या लुटमार सुरू झाली आहे.

गावकऱ्यांचा त्या भंगारवाल्याला विरोध नाही गुन्हेगारी प्रवृत्तीला विरोध आहे, आम्हीही सर्वधर्मसमभाव मानतो पण शेवटी परप्रांतीयांमुळे आजुबाजुला घडणारी गुन्हेगारी त्रासदायक आहे,अशा परिस्थितीत प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराला मात्र विरोध होता. भटाला दिली ओसरी आणि हातपाय पसरी अशी अवस्था होता कामा नये.'येवा कोकण आपलाच आसा.... पण येवा थोडे दिवस रवा आणि ईलल्या मार्गान परत जावा..... ह्या कोकण फक्त आणि फक्त इथल्या कोकणी भूमीपुत्राचेच आहे. ते बळकावण्याचा प्रयत्न करु नका.

# काव्यांगण

## गझल

या भुकेला कैद केले पाहिजे
लांब एकांतात नेले पाहिजे....

राग इतका येत जातो हा मला
की भुकेचे रक्त प्याले पाहिजे....

पाप करते जर अशी कित्येकदा
तर तिने गंगेत न्हाले पाहिजे....

या पुढे एकत्र राहू बोललो
पण तिचे मत एक झाले पाहिजे...


सांग मजला स्वर्ग कोणी पाहिला
तो पहाया प्रथम मेले पाहिजे....

**निलेश गावकर.**
**साळशी, साळशी- देवगड**

## माय मराठी

माझिये लेखन तिच्यासाठी
सदैव उभी माझिया पाठी
विहरते ती चंद्रभागेकाठी
चुकता मी ना भाळी आठी
आम्हां दरम्यान रेशीमी गाठी
दर्शन देई पश्चिम घाटी
तिनेच उघडली मुक्ताईची ताटी
तिच्या प्रेमात मी लेखनप्रपंच थाटी
स्मृतीनेच तिच्या अभिमान दाटी
मनोहर अनोखी तिची धाटी
कपाळी लावते तिच्या पदतळीची माटी
लवचिक भलती जणू तृणाची पाती
उजळता भासे नंदादीपाच्या वाती
गुंजते कितींं तव लोकी साती
वंद्य प्रिय ती मजसी
अती
कोण ? अर्थात माझी
माय मराठी

**डॉ. प्रेमा मेणशी,**
**बेळगावी- कर्नाटक**




## गझल

दश दिशांना मोकळे कर पिंजऱ्यांना पाखरे कर
पाझरू दे कातळाला सर्जनाचे सोहळे कर

दानवांना बुद्ध दे अन् श्वापदांची माणसे कर
अंगठ्यांना अक्षरे कर तू मुक्यांना बोलते कर

हासणारे जग पुन्हा दे लुप्त सारी आसवे कर
प्रेमरूपी जग बनू दे यातनांना हायसे कर

खूप झाले युद्ध आता अर्जुना तू एवढे कर
ईश्वराला सांग अपुल्या शब्द गीतेचे खरे कर

**सुदेश मालवणकर,**
**दापोली**



## अतर्क्य

अनंतातील अनेक गोष्टी शुभ्र पटलावर येतात
टिपून नाही घेतल्या तर झर्रकन निघून जातात
येण्या जाण्या सहज परतण्या नसतो काळवेळ
सावध तोची शहाणा जमतो त्यांच्या संगे मेळ

दिव्य दृष्टी ती व्यापून असते तर्कातर्कातीत
गम्य अगम्य व्यापत जाणे नसे सहज दृष्टीत
सत्य असत्य भ्रामक जग हे विश्व मायातीत
अनंत गुपीते गर्भात हिच्या ह्या मायावी सृष्टीत

अनंताचे हे व्यापून उरणे असे चार आंगूळे
इंद्रधनुच्या सप्तरंगी हे चराचर असे नटलेले
अंत नसे अनंतास ह्या व्याप्ती प्रकाशयोजने
विविधतेने कशी निर्मिली इतक्या सहजपणे

अतर्क्य ह्या समजणे सृष्टीच्या नानाकळा
अनंतास व्यापून उरतो शेषशायी घननीळा
अर्जुनास ही दिव्यदृष्टी दिली नारायणे
अर्जुन होऊनी आपण पाहू ती सहजपणे

**श्रीकांत आपटे,**
**फोंडाघाट**

## मी- एक शिक्षक

समजू नका मला, आराम आहे फार
गलेलठ्ठ पगार आणि सुट्ट्या भारंभार

दिवसरात्र मेहनत घेतो, घडवितो विद्यार्थी
ओबडधोबड मातीतून, तयार करतो मुर्ती
थांबावे लागे कधी कधी, ऑफिसच्या वेळेबाहेर

जनगणना असो वा निवडणुकीचे काम
सरकारी आदेश आला की, घेत नाही आराम
खेडोपाडी कुठेही मग,जाण्यास मी तय्यार

गावोगावी खेडोपाडी, कुठेही असो शाळा
तक्रार नाही केली कधी, बदली केली कितीही वेळा
ठेवून बाजूस सर्व चिंता, गेलो विद्यार्थ्यां समोर

माझे काही बांधव, आहेत विना अनुदानित
माहीत नाही किती दिवस, पगारापासून वंचीत
कोरोनाच्या त्या संकटात, येई डोळ्यापुढे अंधार

असो ऑनलाईन वा ऑफलाईन शिक्षण
विद्यार्थी हित जपणे, हेच माझे जीवन
त्यांच्यासाठी झटतो आहे, सदैव त्यांचाच विचार

दिसत नसेल कार्य माझे, पण आहे मी कष्टकरी
माझ्या शिवाय समाज ही, कल्पनाच केलेली बरी
उपेक्षित मी होतो आहे,द्या मजला आधार

**संतोष पवार,**
**सावंतवाडी**

## व्हॅलेंटाइन डे

सैनिक जेव्हा देशासाठी दिवसरात्र लढत होते
प्रेमासाठी आसुसलेले मन मात्र मरत होते

गुपचुप लग्ने लावून कोणी भावना जपत होते
मानवतेच्या सेवेसाठी सारखे झटत होते

चुगली झाली तेव्हा राजे गनिम रयतेस छळत होते
मरतानाही प्रेमामधले खरेपण बघत होते

व्हॅलेंटाइन शहीद झाले ते दु:ख सलत होते
सभोवताली कृतज्ञतेचे खूप दीप जळत होते

**चारुशीला देऊलकर,**
**मालवण**

## तू भेटशील तेव्हा..

तू भेटशील तेव्हा हसतील काय डोळे
डोळे भरून पाहुन भरतील काय डोळे

ओठांवरीच अडले सांगायचे तुला जे
श्वासात श्वास मिळता वदतील काय डोळे

हातात हात घेता स्पर्शात भान हरपे
लाजून चूर होता झुकतील काय डोळे

तुजला मिठीत घेता अंबर कवेत भासे
स्वप्ने तुझी नि माझी बघतील काय डोळे

जपली सखे उराशी मी आठवण गुलाबी
मग आठवून भेटी छळतील काय डोळे

माझे मला न कळले हे काय चालले ते
मिटले नयन जरी त्वा कळतील काय डोळे

केवळ तुझ्याचसाठी विसरून सर्व आलो
माझ्याकडे पुन्हा ते वळतील काय डोळे

**दीपक पटेकर (दीपी),**
**सावंतवाडी**

## मन माझं फुलपाखरू

मन माझं
फुलपाखरू फुलपाखरू
उडते स्वच्छंदी
स्वप्नांच्या पानां फुलांवरी

मन माझं फुलपाखरू
आहे प्रेम वेडं
जीव लावते
साऱ्या प्राणीमात्रांवरी

मन माझं फुलपाखरू
आहे महत्वाकांक्षी
सवार होते
ध्येयाच्या सागर लाटांवरी

मन माझं फुलपाखरू
आहे सैराट सैराट
झेप घेते
आकाशी चंद्रावरी !

मन माझं फुलपाखरू
होती दु:खी कष्टी,
पाहूनी ही
सध्याची दुनियादारी !

मन माझं फुलपाखरू
होईल ते आनंदी,
जेव्हा नांदेल
स्वर्ग पृथ्वीवरी !

**प्रा. के. एस. शिरबंदे,**
**दापोली.**

# राहुल चव्हाणच्या सन्मानार्थ गौरव रॅली

**आनंद ग. मयेकर**
**मालवण**



"देहाकडून देवाकडे जाताना देश लागतो आणि या देशाचे आपण देणे लागते." स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रगल्भ विचारविश्वातून आणि देशाबद्दलच्या अथांग, निस्पृह प्रेमातून प्रसवलेले हे विचार, देशाच्या प्रत्येक नागरिकाला सदैव प्रेरणा देत राहतील.

मनुष्याला मुख्यत्वे पाच प्रकारच्या ऋणांतून मुक्त होण्याचा शास्त्रोक्त संकेत आहे:
1. *देव ऋण* - निसर्गातील अनेक घटना आणि वस्तू मानवी जीवनासाठी अनुकूल बनवतात.
2. *ऋषी ऋण* - शास्त्र आणि ज्ञान उपलब्ध करून दिले.
3. *पितृ ऋण* - जन्म दिला आणि पालनपोषण केले.
4. *देश/समाज ऋण* - या भूमीवरील प्रत्येक जीवाने आपल्या जगण्यासाठी, उन्नतीसाठी आणि प्रत्येक गरजेसाठी केलेले सहाय्य.
5. *भूत ऋण* - कळत न कळत घडलेले पाप.

**वाचक मित्रांनो, मी आनंद ग. मयेकर, वय ६९ वर्षे, ठाण्यात राहणारा, मूळ गाव मालवण. मी माझ्या या लेखनाच्या सुरुवातीला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचे अग्नीहोत्र प्रज्वलित करून आणि मनुष्याच्या जीवनातील येणाऱ्या "पाच ऋणां"बद्दल संकेत देऊन, आपल्या देशाने आपल्यावर केलेल्या निर्व्याज प्रेमाची आठवण करून दिली आहे.**

मी वरील प्रेरणादायी विचार लिहायला प्रवृत्त झालो, त्यामागे खालील सिंधुनगरीच्या बातमीत दडलेले कारण आहे:
दि. ६ आणि ७ फेब्रुवारी २०२५ रोजी, सिंधुनगरीतील 'प्रहार डिजिटल' वृत्तवाहिनीने खालील बातमी प्रसारित केली होती:
*"राहुल गौरव रॅली, ७ फेब्रुवारी २०२५ सकाळी ८ वाजता"*
आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, कृ. सी. देसाई शिक्षण मंडळ संचलित स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाचे सीनियर अंडर ऑफिसर *राहुल उषा उदय चव्हाण* यांना २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिल्ली येथील राष्ट्रीय संचालनात आणि फ्लॅग एरियामध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळाला. तसेच फ्लॅग एरियामध्ये राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राला तिसऱ्या स्थानावर रँकिंग प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी, सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी आणि मालवण तालुक्यासाठी, विशेषतः मालवणवासीयांसाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. राहुल चव्हाण यांचा सन्मान डायरेक्टर जनरल एनसीसी, महाराष्ट्राचे राज्यपाल आणि ५८ महाराष्ट्र बटालियन या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला आहे.

आरडीसी परेड (Republic Day Camp Parade) मध्ये, मालवण तालुक्यातील एक राष्ट्रीय छात्र सेनेचा तरुण सहभागी होण्याचा हा सन्मान मालवणच्या इतिहासात प्रथमच प्राप्त झालेला आहे. ही बातमी मालवणवासीयांसाठी नक्कीच स्पृहणीय आणि अभिमानास्पद आहे!

गेल्या सहा महिन्यांच्या अथक परिश्रमानंतर, राहुलचे प्रथमच दिल्लीहून मालवणमध्ये आगमन होत आहे. या निमित्ताने, ७ फेब्रुवारी २०२५ रोजी राहुलच्या सन्मानार्थ गौरव रॅली आयोजित करण्यात आलेली आहे.

ही बातमी समजल्यावर, माझ्यासारख्या कट्टर सिंधुवासीयाचा छाती अभिमानाने फुगून आली! गौरव रॅलीच्या या अपूर्व सोहळ्याचा मी प्रत्यक्षदर्शी होऊ शकलो नाही, याचे वैफल्य वाटतेच. पण मालवणी मातीशी नाळ जुळलेल्या मला चि. राहुलच्या कर्तृत्वाबद्दल आणि त्याच्या गौरव सोहळ्याबद्दल आपले आशीर्वादरूपी अभिप्राय लिहून राहुलला पाठवावे अशी स्फूर्ती झाली. सिंधुदुर्ग, म्हणजे आमची सिंधुनगरी, जिच्या विस्तीर्ण सागरकिनाऱ्यांनी आणि विलोभनीय निसर्गसंपत्तीने शोभिवंत झालेल्या या नगरीला साहित्य, वाङ्मय, चित्रकला, शिक्षण, क्रीडा, संगीत आणि साहस अशा विविध क्षेत्रांत स्वतःच्या कर्तृत्वाने यशाचे तेजोवलय निर्माण केलेले अगणित माणिक-मोती लाभले आहेत. त्यांनी आकाशाला गवसणी घालणारे यश संपादन करून स्वतःची कीर्ती प्रदीप्त केलीच, पण सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या शिरपेचात वारंवार मानाचे तुरे रोवून आपल्या जिल्ह्याच्या गौरवगाथा विश्वाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवल्या आहेत.

अशाच माणिक-मोत्यांच्या माळेत आणखी एका रत्नाची भर पडली, जेव्हा मी 'प्रहार डिजिटल' पत्रकातून एका देशप्रेमी, राष्ट्रीय छात्र सेनेच्या तरुणाच्या अद्भुत आणि उत्तुंग भरारीबद्दलची बातमी वाचली. तो आहे मालवणचा सुपुत्र *चि. राहुल उषा उदय चव्हाण*.

चि. राहुल, तू संपादन केलेल्या या हिमालयाएवढ्या उत्तुंग यशाबद्दल तुझे अंतःकरणपूर्वक अभिनंदन! राहुलचे प्रेरणादायी ध्येय: सैनिकी प्रशिक्षणाची ओढ असल्याने, चि. राहुलने या क्षेत्राचा संपूर्ण आणि सखोल अभ्यास करून तत्संबंधी प्रयत्न सुरू केले.

***राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) बद्दल संक्षिप्त माहिती:***
एनसीसी म्हणजे नॅशनल कॅडेट कॉर्प्स. ही भारतीय सशस्त्र दलांची युवा शाखा आहे. एनसीसीची स्थापना २६ नोव्हेंबर १९४८ रोजी करण्यात आली होती. एनसीसीचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे.

***एनसीसीचे उद्दिष्ट:***
- तरुणांमध्ये शिस्त, चारित्र्य, देशप्रेम, कॉम्रेडशिप, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन, साहसाची भावना आणि निःस्वार्थ सेवेचे आदर्श विकसित करणे.
- तरुणांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे.
- एनसीसी कॅडेट्सची कर्तव्ये:*
- परेड आणि रोल कॉल दरम्यान वेळेवर हजर राहाणे.
- उच्च पदांच्या आदेशांचे पालन करणे.
- शिबिराच्या उपक्रमांमध्ये पूर्ण उत्साहाने सहभागी होणे.
- नेहमी योग्य केस कापणे आणि स्वच्छ आणि योग्य पॅटर्नचा गणवेश घालणे.

एनसीसी बद्दल वर नमूद केलेल्या सर्व गोष्टींचा चि. राहुलने सर्वांगाने विचार करून, त्याच्या शालेय आणि महाविद्यालयीन




छात्र सेना पथकात स्वतःचे नाव दाखल करून संबंधित चाचण्यांमध्ये चमक दाखवून निवड प्रक्रियेत उत्तीर्ण झाला. लेफ्टनंट डॉ. प्रा. एम. आर. खोत यांच्या सजग मार्गदर्शनाखाली, पुढील प्रशिक्षण नित्यनेमाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने सुरू केले.

चि. राहुलच्या डोक्यात एकच विचार होता, की छात्र सेनेत दाखल होऊन "एकता आणि शिस्त" या एनसीसीच्या ब्रीदवाक्याला स्मरून आणि कठोर प्रयत्न करून एक उत्कृष्ट नॅशनल कॅडेट बनायचे आणि देशसेवा करायची. त्याच्या डोळ्यात एक तेजस्वी स्वप्न होते, की प्रजासत्ताक दिनाच्या संचालनात सहभागी व्हायचे.

या विचार-स्वप्नांच्या पायघड्यावरून मार्गक्रमणा करीत, ५८ महाराष्ट्र एनसीसी बटालियन, ओरोस, सिंधुदुर्ग येथे गणतंत्र संचालन शिबिराच्या निवड चाचणीत यथोचित यश प्राप्त करून, पुढे कोल्हापूर विभागीय स्पर्धेत निवड संपादन केली. अशा मजलादरमजल यशाच्या पायऱ्या चढत, अंतिम टप्प्यापर्यंत जाऊन पोहोचली आणि पुणे येथे पार पडलेल्या प्री-रिपब्लिक डे कॅम्पमध्ये आपले अव्वल स्थान बळकट करून दिल्ली येथील मुख्य गणतंत्र दिन शिबिरात सहभागी होण्याचे स्वप्न साकार केले. आणि प्रथमच, सिंधुदुर्ग-मालवणचा हा सुपुत्र, राजधानी दिल्लीच्या राजपथ/कर्तव्यपथावर, २६ जानेवारी २०२५ रोजी, म्हणजेच प्रजासत्ताक दिनी, साजरा होणाऱ्या भव्य संचालनात, आपल्या मनीच्या देशनिष्ठेचे/श्रद्धेचे प्रतीक दर्शविण्यासाठी मार्गक्रमित झाला!

ज्या अतुलनीय आणि अद्वितीय मानाचा मानकरी चि. राहुल बनला आहे! राहुलच्या या अभिनंदनीय यशामागे त्याने मनाशी बाळगलेले ४C आणि ४D फॉर युवर सक्सेस: नव्या पिढीतील तरुण/तरुणींना सदैव मार्गदर्शक ठरतील:
- *४Cs:* Conviction (दृढ विश्वास), Clarity (स्पष्टता), Commitment (वचनबद्धता) आणि Consistency (सातत्य).
- *४Ds:* Desire (इच्छा), Dedication (समर्पण), Determination (निश्चय) आणि Discipline (शिस्त).

ही C आणि D ची तत्त्वे अंगिकारून आणि त्यानुसार कटाक्षाने अनुसरण करून, राहुलने आपल्या ध्येयाच्या अवकाशावर यशाचे सप्तरंगी इंद्रधनुष्य चितारले आहे!

चि. राहुलच्या या गगनभेदी यशामागे, युवा पिढीला घडविणारे जे कर्मनिष्ठ-ध्येयनिष्ठ दीपस्तंभ आहेत, त्यांचा येथे उल्लेख करणे फार जरुरी आहे:
1. *५८ एनसीसी बटालियन कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल श्री. एम. आर. खोत* (मार्गदर्शक).
2. *सुभेदार मेजर श्री. दिनेश गेडाम*.
3. *एनसीसी फर्स्ट ऑफिसर कर्नल श्री. दीपक दयाल*

**पान १३ वर.**

**पान १२ वरून**

रिपब्लिक डे कॅम्प परेडमधील सहभागासाठी, चि. राहुलचे मनोबळ दृढ करण्यासाठी, स. का. पाटील महाविद्यालयाचे संचालक मंडळ, प्राध्यापक वृंद, सहकारी तथा हितचिंतक यांचे स्पृहणीय आणि असीम सहाय्य सदैव स्मरणीय आणि अनुकरणीय राहील.

आणि लास्ट बट नॉट द लीस्ट, मला पुढील दोन शिल्पकारांच्या नावाचा उल्लेख करणे समयोचित आहे, ते म्हणजे चि. राहुलचे पालक: *श्री. उदय चव्हाण आणि सौ. उषा चव्हाण*. या महत्त्वाच्या शिल्पकारांनी, चि. राहुलच्या यशोमंदिरासाठी त्यागपूर्ण पाठबळ दिले आहे.

ज्या ध्येयाने (गणतंत्र दिन संचालन सहभाग) चि. राहुल ध्येयवेडा झाला, त्या ध्येयामागील उदात्तता समजून घेणे आवश्यक आहे. भारतीय प्रजासत्ताक दिन हा भारताच्या प्रजासत्ताकात सन १९५० पासून दरवर्षी २६ जानेवारी रोजी साजरा होणारा राष्ट्रीय सण आहे. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते. भारताचे राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे.

भारताच्या संविधानाच्या निमित्ताने भारताचा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात येऊ लागला. दरवर्षी २६ जानेवारी रोजी भारताच्या राजधानीत, म्हणजे नवी दिल्ली येथे, एक मोठे संचलन आयोजित केले जाते. हे संचलन रायसीना हिलपासून राष्ट्रपती भवनापर्यंत राजपथ मार्गाद्वारे जाते. संचलनाच्या अगोदर अनाम सैनिकांसाठी बनवले गेलेले स्मारक, अमर जवान ज्योती, येथे भारताचे पंतप्रधान पुष्पचक्र अर्पण करतात. भारतासाठी आपले अमूल्य प्राण अर्पण करणाऱ्या वीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात येते.

त्यानंतर पंतप्रधान राजपथाच्या मुख्य मंचावर जातात व आलेल्या पाहुण्यांना भेटतात. तितक्यात प्रमुख पाहुण्यांसोबत राष्ट्रपतींचे आगमन होते. राष्ट्रगीत सुरू होताच, राष्ट्रपती ध्वजारोहण करतात व २१ तोफांची सलामी दिली जाते. त्यानंतर देशासाठी शौर्य गाजवलेल्या सैनिकांना राष्ट्रपतींच्या हस्ते अशोक चक्र आणि कीर्ती चक्र हे मुख्य पुरस्कार देण्यात येतात. राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेली देशातील शूर बालके सजवलेल्या हत्तीवरून किंवा वाहनावरून या संचलनात सहभागी होतात. प्रमुख पाहुणे म्हणून परराष्ट्रीय राष्ट्राध्यक्षांना निमंत्रण दिले जाते.

भारतीय फौजांचे (नौदल, पायदल, वायुसेना) वेगवेगळे सेनाविभाग, घोडदळ, पायदळ, तोफखाना आणि इतर अद्ययावत शस्त्रे/क्षेपणास्त्रे (जसे पृथ्वी, अग्नी), रणगाडे समवेत संचलन करतात. भारताचे राष्ट्रपती या फौजांची मानवंदना स्वीकारतात. या संचलनाबरोबरच भारतातील विविध संस्कृतींची झलक प्रस्तुत केली जाते. त्यासाठी भारतातील राज्यांनी आपापल्या राज्याचे चित्ररथ पाठविलेले असतात.

बीटिंग रिट्रीट सोहळ्याला प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचा समारोपही म्हटले जाते. प्रजासत्ताक दिनानंतर तिसऱ्या दिवशी, म्हणजे २९ जानेवारीच्या संध्याकाळी, बीटिंग रिट्रीटचा सोहळा आयोजित केला जातो.

राष्ट्रीय शौर्य पुरस्कार दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला देशातील शूर मुला-मुलींना दिले जातात. या पुरस्काराची सुरुवात १९५७ साली झाली. पदक, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार

# राहुल चव्हाणच्या सन्मानार्थ गौरव रॅली

मिळालेल्या मुलांच्या शालेय शिक्षणासाठी आर्थिक सहाय्यसुद्धा केले जाते. आपण सारे, आपल्या भारत मातेचे ऋणनिर्देश करून पुढील प्रार्थना करूया:

**"नमस्ते सदा वत्सले मातृभूमे, त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम्।**
**आम्हा लेकरांवर सदैव मातृप्रेमाचे छत्र धरणाऱ्या मातृभूमि! मी तुला सदैव साष्टांग दंडवत अर्पण करतो.**
**महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे, पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते॥"**

**अशा भव्य दिव्य सोहळ्यामध्ये, आपला सिंधुसुपुत्र चि. राहुलने प्रजासत्ताक दिनी झालेल्या अभूतपूर्व संचालनात सहभागी होऊन, मालवणचे, स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, आपला मालवण तालुका, सिंधुदुर्ग जिल्हा आणि पर्यायाने महाराष्ट्र राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला, त्यासाठी या सिंधुपुत्राला, म्हणजेच चि. राहुलला, तमाम सिंधुवासीयांतर्फे या मालवणी वृद्ध काकाच्या अंतःकरणपूर्वक शुभेच्छा आणि त्याच्या भविष्यातील प्रत्येक सृजनात्मक भरारीसाठी उदंड आशीर्वाद!**




**दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या ,अडचणींना थेट वाचकांपर्यंत पोहोचविण्यात येतील आणि तुमच्या नावासहित त्यांना प्रसिद्ध करण्यात येतील. लेख,कथा,कविता - SINDHUDURG.SAMACHAR@GMAIL.COM वर पाठवाव्यात. जाहिरातीसाठी 9822979732 आणि KDRUPA@GMAIL.COM येथे आणि KDRUPA@GMAIL.COM येथे संपर्क करावा**

# बाथरूमसाठी वास्तु टिप्स

**पान ९ वरून.**

टॉयलेट दक्षिण-पूर्व किंवा उत्तर-पूर्व दिशेला असल्यास दोष मानले जातात.

६. बाथरूमचे रंग:
✔ वास्तुशास्त्रानुसार फिकट निळा, पांढरा, हलका गुलाबी, हलका हिरवा असे सौम्य रंग शुभ मानले जातात.
✔ गडद काळा, गडद लाल किंवा गडद तपकिरी रंग टाळावेत.

७. गीझर आणि इतर उपकरणे:
✔ गीझर आणि पाणी गरम करण्याचे उपकरणे दक्षिण-पूर्व कोपऱ्यात ठेवावीत.
✔ वॉशिंग मशीनसाठी उत्तम दिशा दक्षिण-पूर्व किंवा उत्तर-पश्चिम आहे.

८. सुगंध आणि स्वच्छता:
✔ बाथरूम नेहमी स्वच्छ आणि कोरडे ठेवावे.
✔ सुगंधी अगरबत्ती, कँडल्स किंवा नैसर्गिक पॉटपूरीचा वापर करावा.

९. बाथरूममध्ये ठेऊ नये अशा गोष्टी:
❌ देवतांचे चित्र किंवा मूर्ती बाथरूममध्ये ठेऊ नये.
❌ वापरलेले कपडे, ओल्या टॉवेल्स यामुळे निगेटिव्ह एनर्जी वाढते, त्यामुळे ते लवकर सुकवावेत.
❌ तुटलेली बादली, खराब नळ किंवा गळके पाईप्स असतील तर तत्काळ दुरुस्ती करावी.

१०. वास्तुदोष उपाय:
👉 जर बाथरूम चुकीच्या दिशेला असेल आणि बदल करणे शक्य नसेल, तर बाथरूमच्या बाहेर तांब्याचा स्वस्तिक लावावा.
👉 सॅनिटरी फिटिंग्जसाठी चमकदार स्टील किंवा ब्रास मटेरियल वापरणे शुभ मानले जाते.
👉 बाथरूमच्या दारावर piramid, वास्तु यंत्र किंवा समुद्रातील शंख ठेवणे लाभदायक ठरते.

💡 निष्कर्ष:
वास्तुशास्त्रानुसार बाथरूम योग्य दिशेला आणि योग्य प्रकारे बांधल्यास घरात सकारात्मक ऊर्जा वाढते आणि आरोग्य, समृद्धी आणि शांतता टिकून राहते. त्यामुळे बाथरूमची रचना करताना किंवा नूतनीकरण करताना वरील वास्तुशास्त्र नियम पाळणे आवश्यक आहे.